cmyk

## संपादकीय

### पायाभूत सुविधांवर भर; बेस्टला भरीव मदतीची गरज

देशाची आर्थिक राजधानी मुंबईचा आर्थिक गाडा चालविणारा अर्थसंकल्प मंगळवारी मुंबई महापालिकेने सादर केला. यंदाचा मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा आकडा संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा म्हणजे सुमारे ८.५० अब्ज डॉलर इतका आहे. त्याचे कारण एवढे बजेट देशातील अनेक राज्यांचे देखील नसते. खास म्हणजे जगातील सुमारे ५० असे देश आहेत, ज्यांचा जीडीपी ८.५० अब्ज डॉलर देखील नाही. या देशात मॉन्टेंगरो, मालदीव, भूतान, जांबिया आदी देशांचा समावेश आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८६ | शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन वरुन पाच लाखा पर्यंत

## किसान क्रेडिट कार्डधारकांची संख्या वाढणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी असलेल्या किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीनवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. याचा जिल्ह्यातील ९६ हजार कार्डधारक शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून तीन लाख रुपयांपर्यंत व्याज सवलत देण्यात आली आहे. यामुळे आगामी काळात कार्डधारकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.**

शेतकऱ्यांना शेतीच्या पूर्व मशागतीसह पेरणी, बी–बियाणे, कीटकनाशके अशा कृषी निविष्ठा खरेदी करता याव्यात, यासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना लागू करण्यात आली आहे. बँकांचे कर्जदार सभासद असलेल्या शेतकऱ्यांना क्रेडिट कार्ड देण्यात येतात. नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात किसान क्रेडिट कार्डची मर्यादा पाच लाख रुपयांवर वाढविण्यात आली आहे. आतापर्यंत ही मर्यादा तीन लाख रुपये इतकी होती. नव्याने वाढविण्यात आलेल्या मर्यादेत आता शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत रक्कम घेतल्यास त्यावर व्याज लागणार नाही. त्यांना शून्य टक्के व्याजदराची सवलत योजना लागू करण्यात आली आहे. त्यानंतर



### कृषी क्षेत्राशी संबंधित खर्चासाठी वापर करा

किसान क्रेडिट कार्डवर मिळणाऱ्या रकमेचा वापर कृषी निविष्ठा खरेदी करण्यासाठी किंवा शेतीशी संबंधित कामांकरिताच करावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे. आता मर्यादा वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना खर्चासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध झाला आहे. मात्र त्याचा वापर काटेकोरपणे केल्यास शेतकऱ्यांना लाभ होऊ शकणार आहे.

उचलण्यात येणाऱ्या रकमेवर सात टक्के व्याज आकारण्यात येणार असून यातील एक टक्का व्याज सरकार भरणार आहे. उर्वरित सहा टक्के व्याज शेतकऱ्यांना भरायचे आहे. अमरावती जिल्ह्यात किसान क्रेडिट कार्डधारकांची संख्या जवळपास ९६ हजार इतकी आहे. त्यामध्ये २१ हजार ८७२ शेतकरी जिल्हा पान २ वर

# कराडसह गँगची नार्कोटेस्ट करा–आ.धस

## दोन महिन्यांपासून आंधळे फरार

**बीड । प्रतिनिधी**

**आका आणि त्यांच्या गँगचा माज अजून संपलेला नाही. अशोक मोहिते प्रकरणातील आरोपी हे कृष्णा आंधारेचे मित्र आहेत. आका आणि त्याच्या सहका–यांची नार्को टेस्ट करा अशी मागणी भाजप आ. सुरेश धस यांनी केली आहे.**

दोन महिने झाले तरी कृष्णा आंधळे फरार आहे. तर अशोक मोहितेच्या प्रकरणामध्ये जे आरोपी आहेत ते कर्नाटकमध्ये पकडले आहेत. मी अजूनही





तेच म्हणतोय की आका आणि त्यांच्या गँगचा माज अजून संपलेला नाही. सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, अशोक मोहिते नावाचा मुलाची तब्बेत नाजूक आहे. त्यामुळे आरोपींवर ३०७ चा गुन्हा दाखल करावा म्हणजे हे आतमध्ये जातील. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याला आपल्या कुटुंबाप्रती कोणतीही आस्था नाही. तो करुन करुन काय करणार? कारण त्याचा इतिहासच तसा आहे. त्याला कुणाविषयीही प्रेम नाही. तो निघाला की कुठेही एकटाच निघतो. तसा तो गेलेला आहे. पण जाऊन जाऊन कुठे जाणार? पोलिस व सीआयडी तपासाच्या बाहेर तो जाऊच शकत नाही. मुळात या प्रकरणातील पुरावे विष्णू चाटे व आकाने नष्ट केल्याची भीती आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड संदर्भातील पान २ वर

### प्रचंड संताप होतोय

सुरेश धस म्हणाले की, धनंजय देशमुख यांचा त्रागा रास्त आहे. मी त्यांच्या व महादेव मुंडे यांच्या कुटुंबासोबत आहे. माझे डीवायएसपींशी बोलणे झाले आहे. त्यांनी तपास सुरू असल्याचे सांगितले. याशिवाय एसपींनी त्यांना एलसीबीचेही काही सहकारी तपासासाठी दिलेत. महादेव मुंडे यांच्या मारेकरीही लवकर सापडले पाहिजेत. त्याच्या मुलाच्या डोळ्यातील पाणी पाहून माझा प्रचंड संताप होत आहे. त्यामुळे त्याला न्याय मिळणे गरजेचे आहे.

# १४ साखर कारखाने बंद

## आतापर्यंत ६१ लाख टन उत्पादन

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात साखर हंगाम अखेरच्या टप्प्यात असून, आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखर उत्पादन झाले असून, राज्यातील १४ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. आतापर्यंत सर्वाधिक १७ लाख टन साखर उत्पादन कोल्हापूर विभागात झाली असून पुणे विभागात १४ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली आहे. यंदा राज्यात ८५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

यंदाचा गाळप हंगाम एक



नोव्हेंबरला सुरू होणे अपेक्षित असताना विधानसभा निवडणूक व त्यानंतर आलेली दिवाळी यामुळे हंगामास तुलनेने महिनाभराचा उशीर झाला. तरीदेखील पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे यंदा राज्यात उसाला तुरे येण्याचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, साखर कारखान्यांना या उसाचे गाळप तातडीने करावे लागत आहे. त्यासोबत पान २ वर

## एसीबीचे पथक केजरीवाल यांच्या घरी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

आम आदमी पक्षाचे (आप) संयोजक अरविंद केजरीवाल यांनी कोणाचेही नाव न घेता भाजपवर उमेदवारांच्या घोडेबाजाराचा आरोप केला. केजरीवाल यांनी दावा केला की, त्यांच्या आमदारांना आणि उमेदवारांना फोनवरून प्रत्येकी १५ कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. दरम्यान शुक्रवारी सकाळी एसीबीचे पथक केजरीवाल यांच्या घरी पोहचून चौकशी केली.


केजरीवाल यांच्या आरोपांनंतर, भाजपने उपराज्यपाल व्हीके सक्सेना यांना पत्र लिहून आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली. यानंतर, एलजींनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला पान २ वर

## लातूर–कलबर्गी मार्गावर भीषण अपघात; पाच जण गंभीर जखमी

**उमरगा । प्रतिनिधी**

लातूर कलबर्गी मार्गावर आज सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास भीषण अपघात, नारंगवाडी साठवण तलावाजवळ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबा पाटील यांच्या इनोव्हा कार व पिक अपची समोरा समोर धडक, अपघातात पिक अप मधील पाच जण गंभीर जखमी झाले.

अजय सिद्राम जमादार (वय ४०), शंकर आप्पाराव लवटे (वय ५५ ), शंकर माणीक



जमादार (वय ४०), धनराज वडदरे (वय ४५) सर्व जण रा कराळी पान २ वर

## खरेदी केंद्र बंद ; जिल्ह्यात लाखो टन सोयाबीन खरेदीविना

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने दिलेला खरेदी कोटा पूर्ण झालेला नसताना एकूण बीड जिल्ह्यातील नाफेडकडील ४४ हजार ७४४ या नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचा माल खरेदी केलेला आहे. म्हणजे ५०% सुद्धा शेतकऱ्यांचा माल खरेदी न करता देखील तारखांचे दाखले देऊन शासकीय खरेदी केंद्र बंद करण्यात आले आहेत.सोयाबीन हमीभावाने पूर्ण खरेदी

### शेतकऱ्यांनो लढाईशिवाय पर्याय नाही–अजय बुरांडे

सरकरने करावी यासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून लढाई करावी लागणारी आहे अशी खंत किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी व्यक्त केली आहे.

सत्तेत आलेल्या महायुतीच्या सरकारने निवडणुकीत सोयाबीनला ६ हजार रुपयांचा हमीभाव असे आश्वासन दिले होते. त्यानंतर राज्यसरकारने प्रतिक्विंटल ६,९४५ रु हमीभाव शिफारस केलेली असताना केंद्रसरकारकडून ४,८९२ रु हमीभाव जाहीर केला होता परंतु शासकीय खरेदी केंद्रावर शेतमाल विकलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा ‘‘हमाली–काढता–बारदाना‘‘ या नावाखाली प्रतिक्विंटल १५० ते २०० रुपयाला शेतकऱ्यांचा खिसा मारून, जाहीर केलेला हमीभाव सुद्धा न देण्याचे पाप या सरकारने केले असून आणि आत्ता तर थेट शासकीय खरेदी पान २ वर

# नवीन कत्तलखान्याचे प्रस्ताव रद्द

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिली माहिती

**जालना । प्रतिनिधी**

**कत्तलखाना संदर्भात सुरू करण्याचा अंतिम निर्णय झाला नव्हता फक्त विभागाचा प्राथमिक प्रस्ताव विचाराधीन होता तो रद्द करण्यात आला आहे. अशी माहिती जालन्याचे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचे पीए मंदार वैदय यांच्याकडून कळविण्यात आले.**

संतांची भूमी आणि अहिंसेचे प्रतीक असलेल्या जालना शहरात प्रस्तावित कत्तलखान्याच्या उभारणीविरोधात सकल जैन समाजासह हिंदू महासभेचा प्रयत्न मुळे सदरील शेळ्या मेंढ्याचा कत्तलखाना बंद करण्याचा निर्णय झाला असल्याचे समजते याप्रकरणी बुधवार दि. ५ फेब्रुवारी रोजी या निर्णयाविरोधात आवाज उठवत



आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आल्यानंतर आज ६ फेब्रुवारी रोजी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जालना येथे कत्तलखाना उभारण्याचा निर्णय तात्काळ रद्द केला असल्याचे स्वीय सहाय्यक मंदारजी वैद्य यांच्या मार्फत श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा यांना कळविली आहे. अहिंसावादी सकल जैन समाजाच्या विरोधामुळे अखेर शासनाला हा निर्णय मागे घ्यावा लागला असून, प्रस्तावित कत्तलखान्याचा निर्णय रद्द करण्यात आल्याने समाज बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. जालना हे केवळ ऐतिहासिक आणि औद्योगिकदृष्ट् ?या महत्त्वाचे शहर नसून, ते संतांची भूमी आणि अहिंसेच्या तत्त्वांचा प्रचार करणारे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. पान २ वर

# वडवणी ते चिंचोटी रस्त्यावर जीवघेणा प्रवास करण्याची वेळ

## वंचित बहुजन युवा आघाडी करणार आंदोलन

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी ते चिंचोटी दरम्यान तीन किलोमीटर अंतर रस्ता अत्यंत खराब झाला आहे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ता आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे या खड्ड्यावर अनेक अपघात होऊन नागरिक जखमी झाले आहेत वेळोवेळी मागणी करूनही रस्त्यावरील खड्डे बुजवले जात नाहीत त्यामुळे संतप्त झालेले वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी वडवणी तहसीलदारांना निवेदन देऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**



चिंचोटी रस्ता पूर्ण खड्डामय झाला आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी अवस्था झाली आहे. मोठे मोठे जीवघेणे खड्डे झाले पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १.५० क्विंटल | २,६५० | २,६५० | २,६५० |
| ज्वारी/हायब्रिड : २.५० क्विंटल | २,१०० | २,४०० | २,२६७ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४१.५० क्विंटल | ६,७०० | ७,००० | ६,८६६ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,००० | ६,३०० | ५,६५० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,०६१ | ३,१०० | २,४५७ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ३,९०० | ४,०२१ | ३,९६० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ४,५११ | ४,५११ | ४,५११ |

# कायदा हातात घेऊ नका

## एस.पी.नवनीत कावत यांनी दिली ८० गुन्हेगारांना तंबी






**बीड । प्रतिनिधी**

**यापुढे जर कोणी कायदा हातात घेतला तर मी सोडणार नाही. त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करेल अशी तंबी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यातील विविध प्रकरणातील ८० गुन्हेगारांना पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून तंबी दिली. या संदर्भात अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी ही माहिती दिली.**

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे सर्वतोपरीने प्रयत्न करत आहेत. मागील काही काळात संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार अनेक टोळ्यांवर कारवाई केलेली आहे. याशिवाय छोटे–मोठे गुन्हेगार, गुटखा माफिया, वाळूमाफिया यांच्यावरही अंकुश ठेवण्याचे काम पोलीस अधीक्षकांनी केले आहे. कुठली कारवाई झाली नाहीतर पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सोडणार नाही अशी तंबीच त्यांनी दिली. त्यानंतर बीड जिल्ह्यात पोलीस यंत्रणा ॲक्शन मोडवर आली आणि प्रत्येक गोष्टीवर आता बारकाईने लक्ष ठेवायला सुरुवात झाली आहे. शुक्रवारी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यातील जवळपास ८० विविध प्रकरणातील गुन्हेगारांना बोलावून त्यांना यापुढे कायदा सुव्यवस्था बिघडवण्यासाठी प्रयत्न केले किंवा कुठलाही अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही सोडणार नाही .त्यासाठी कुठलाही गुन्हा करू नका, सावध रहा. आणि पोलिसांनाही सहकार्य करा अशी तंबीच यावेळी पोलीस अधीक्षकांनी दिली. यासंदर्भात अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी सर्वांना सूचना दिल्या. या संदर्भात त्यांनी प्रसारमाध्यमांनाही याविषयी सविस्तर माहिती दिली. यापुढे जिल्ह्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पायाभूत सुविधांवर भर; बेस्टला भरीव मदतीची गरज

देशाची आर्थिक राजधानी मुंबईचा आर्थिक गाडा चालविणारा अर्थसंकल्प मंगळवारी मुंबई महापालिकेने सादर केला. यंदाचा मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा आकडा संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा म्हणजे सुमारे ८.५० अब्ज डॉलर इतका आहे. त्याचे कारण एवढे बजेट देशातील अनेक राज्यांचे देखील नसते. खास म्हणजे जगातील सुमारे ५० असे देश आहेत, ज्यांचा जीडीपी ८.५० अब्ज डॉलर देखील नाही. या देशात मॉन्टेंगरो, मालदीव, भूतान, जांबिया आदी देशांचा समावेश आहे. मुंबईचा अर्थसंकल्पाचा आकडा इतका मोठा का आहे. जगात असे कोणते देश आहेत ज्यांचा जीडीपी मुंबई महानगरपालिकेच्या बजेटपेक्षा कमी आहे, हा सुद्धा एक चर्चेच्या केंद्रस्थानी विषय बनला आहे. तसेच, या अर्थसंकल्पात भांडवली खर्चासाठी ४३ हजार १६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, तर महसुली खर्च ३१ हजार २०४ कोटी ५३ लाख रुपये आहे. त्यातून मुंबई महापालिकेने मोठ्या प्रमाणात प्रकल्प हाती घेतल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पांचा खर्च भागवण्यासाठी लागणाऱ्या निधीची गरज लक्षात घेऊन, महापालिकेच्या मुदत ठेवींतूनच ही रक्कम उचलली जाणार आहे, हे कटू सत्य नाकारता येत नाही.

चालू अर्थसंकल्प हा ५९ हजार ९०० कोटींचा मांडण्यात आला होता, तो सुधारित करून त्याचे आकारमान ६५,१८० कोटींवर नेण्यात आले आणि आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान या सुधारित अर्थसंकल्पाच्या तुलनेत १४.१९ टक्क्यांनी वाढवून ७४,४२७ कोटी रुपयांवर नेऊन ठेवला आहे. त्यामुळे अंतर्गत कर्जावरच अर्थसंकल्पाचा आकडा वाढवण्यात आल्याची बाब लेखा परीक्षण करणाऱ्या किंवा अर्थतज्ज्ञांच्या सहज लक्षात येईल; परंतु सर्वसामान्य मुंबईकरांना या आकड्याशी काही देणे-घेणे नसते. महापालिकेकडून कोणत्या नागरी सुविधा पदरात पडतात, याची नागरिकांना प्रतीक्षा असते; परंतु मुंबईत ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी आपल्याला दिसते. फेरीवालामुक्त मुंबईचे अभियान राबविण्यात येते. मुंबई उच्च न्यायालयातून वारंवार निर्देश येऊनसुद्धा अनधिकृत फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुंबईकरांची अद्याप सुटका होऊ शकली नाही. मुंबई महापालिकेच्या अख्यत्यारीत बेस्ट प्रशासन येते. आज बेस्ट बस गाड्या खासगीकरणाच्या माध्यमातून चालवल्या जात असताना, बेस्ट प्रवासी यंत्रणेची काय अवस्था झाली आहे, याचे भान बेस्ट प्रशासनाला आहे. पण, प्रशासनाकडून त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने म्हणावेसे तसे प्रयत्न केले जात नाहीत. आता मुंबईकरांचे हाल होऊ नयेत म्हणून बेस्ट प्रशासनाला मोठ्या भावाच्या नात्याने सांभाळून घेण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेने घ्यायला हवी. अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार, मुंबई महापालिका सुमारे दोन हजार ५० किमी लांबीच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणार आहे. आतापर्यंत एक हजार ३३३ किमी रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले असून, अन्य कामांना गती देण्यावर भर देण्यात आला आहे. सागरी मार्गासाठी १ हजार ५०७ कोटी २४ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर, 'बेस्ट' उपक्रमाला १ हजार कोटींचे अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली असली तरी, बेस्ट प्रशासनाला सावरण्यासाठी अपुरी आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी ५ हजार ५४८ कोटी, रस्ते आणि वाहतूक विभाग ६५१९ कोटी रुपये, पूल विभाग ८३६९ कोटी रुपये, मुंबईतील प्रमुख महापालिका रुग्णालयांसाठी २ हजार ४५५ कोटी रुपयांची रक्कम खर्च केली जाणार आहे. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या मते मुंबई महानगरपालिकेने सादर केलेले हे आतापर्यंतचे सर्वात मोठे बजेट आहे. रस्त्याच्यां क्रॉंक्रिटीकरणाचे काम ज्या एजन्सींना देण्यात आले आहे त्यांच्यानुसार, आयआयटी मुंबई शहरातील काँक्रिटीकरणाच्या कामांवर लक्ष ठेवणार आहे. पावसाळ्याचा कामात व्यत्यय येऊ नये म्हणून हे काम ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. आरोग्य सेवांवर बजेटच्या १० टक्के रक्कम खर्च करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. आरोग्य सेवा आपल्या दारी योजनेअंतर्गत मुंबईभर घरोघरी आरोग्य तपासणी सुरू करण्याची योजना बीएमसीने आखली आहे. मुंबई महापालिकेच्या ठेवी ९८ हजार कोटींच्या वर होत्या. प्रशासनाच्या हाती कारभार असताना, त्यातून पायाभूत सुविधांसाठी खर्च करण्यात आल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. या जानेवारी अखेरपर्यंत ८२ हजार ८५४ हजार कोटी ठेवी असल्याचे आयुक्त गगराणी यांचे म्हणणे आहे. गुंतवणुकीसोबत पायाभूत सुविधांसाठी सुद्धा या ठेवींचा वापर करण्यात येणार आहे. मागील पावणेतीन वर्षांच्या कालावधीकडे नजर टाकली, तर ७ मार्च २०२२ रोजी नगरसेवकांचा कार्यकाल संपल्यानंतर महानगरपालिकेवर आता प्रशासकाचे राज्य आहे. मुंबई महापालिकेत प्रशासकामार्फत कारभार केला जात आहे, त्यात महापालिका प्रशासन आणि राज्य सरकार यांचीच महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. आयुक्तांकडे प्रशासकाचा कारभार असताना, मुंबईत अनेक ठिकाणी रस्त्यांची खोदकामे चालू दिसतात. रस्त्यांच्या नूतनीकरणावर भर दिल्यामुळे मुंबईतील एक ते दोन किलोमीटरचा परिसर नाही. त्या ठिकाणी रस्त्यांवर कामे सुरू नाहीत, असे चित्र विरळेच; परंतु प्रशासन कंत्राटदारांच्या माध्यमातून ही कामे करत असताना, त्या कामाचा दर्जा तपासणार कोण?, हा संशोधनाचा विषय आहे.

## हायकोर्टाचा निर्णय,गायरान जमिनींवरील अतिक्रमणे त्वरित हटवा !

**जालना । प्रतिनिधी**

**गायरान जमिनींवर झालेली अतिक्रमणे येत्या चार महिन्यांत हटविण्यात यावीत, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. या अतिक्रमणांविरोधात उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. गायरान जमिनींचे संरक्षण गरजेचे आहे.**

या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करण्याचा कोणालाही अधिकार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि व्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने स्पष्ट करून नाशिक जिल्ह्याच्या येवला तालुक्यातील डोंगरगाव येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. ही कारवाई ग्रामपंचायतीच्या माध्यामातून पूर्ण करावी, असेही खंडपीठाने बजावले आहे. गायरान जमिनीवरील अतिक्रमणांकडे लक्ष वेधत डोंगरगाव वेधील प्रामस्थांनी ॲड. एकनाथ ढोकळे यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल केली आहे. या माचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आरापे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने अतिक्रमणांचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करून त्यावर कारवाई करण्यासाठी राज्य सरकारला चार महिन्यांची मुदत दिली. त्यावर सरकारी वकिलांनी अतिक्रमणे हटवण्यासाठी योग्य ती कारवाई शुरू असून ती निर्धारित वेळेत हटवली जातील, अभी हमी दिली. यावेळी याचिकेला विरोध करीत ग्रामपंचायतीच्या वतीने ऑ ग्रामसेवकांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलं मात्र न्यायलयाने त्यावर कोणतेही भाष्य केले नाही. कोणालाही सरकारी जमिनीवर अतिक्रमण करण्याचा अधिकार नाही, असे बजावत खंडपीठाने अतिक्रमणांवर चार महिन्यांत कारवाई करण्याचे सक्त आदेश दिले. अशाच गायरान जमिनीवर जालना जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे . अंबड, भोकरदन, मंठा, परतूर, घनसावंगी, बदनापूर, जाफराबाद या आठही तालुक्यात गायरान जमिनीवर अतिक्रमण असल्याचे बोलल्या जात आहे तसेच या प्रकरणी अंबड तालुक्यातील जामखेड या भागात पण सगळ्यात जास्त गायरान जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार पण झाल्याचे बोलल्या जात आहे.

## महिला पोलिस उपनिरीक्षक लाचप्रकरणी अटकेत

**नागपूर । प्रतिनिधी**

**नागपूर ग्रामीणमधील एमआयडीसी बुटीबोरी पोलिस ठाण्यात गुन्हे प्रगटीकरण पथकप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या महिला पोलिस उपनिरीक्षक ज्योत्स्ना प्रभू गिरी(३४) यांना लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहात पकडले आहे. चोरीच्या गुन्ह्यातील तक्रारदाराला आरोपी न करण्यासाठी लाच मागितली होती.**

तक्रारदाराने एसीबीकडे याबाबत तक्रार केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. आरोपी पोलिस उपनिरीक्षक गिरी यांनी तडजोडीअंती ३० हजार रुपयांची लाच स्वीकारण्यास तयारी दर्शवली. पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रगटीकरण कक्षात पंचांसमक्ष लाचेची रक्कम स्वीकारताना त्यांना पकडण्यात आले. विशेष म्हणजे याआधी दोन दिवसांपूर्वीच कोराडी पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमानंद दादाराव कात्रे (४३) यांनाही दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने अटक केली होती. तक्रारदारावर कारवाई न करता प्रकरणाचे सेटलमेंट करून देण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती. सलग दोन दिवसांत पोलिस अधिका-यांवर झालेल्या या कारवाईमुळे पोलिस विभागात खळबळ उडाली आहे.

## नव्या एमआयडीसी साठी आ.क्षीरसागर यांचा पुढाकार!



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड येथील औद्योगिक वसाहत अर्थात एमआयडीसीच्या विकासाला गती मिळावी त्यातून तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा व औद्योगिक विकासात बीड जिल्हा पुढे यावा यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीपभैय्या क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला आहे. याबाबत शुक्रवारी (दि.७) त्यांनी एमआयडीसी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बीड येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेत चर्चा केली.**

जमिन पाहणी करण्यात आली असल्याचे सांगत याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, यांच्याकडे रीतसर पत्रव्यवहार केला आहे. बीड येथील एमआयडीसी संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या या बैठकीला एमआयडीसी विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली मुळे, प्रादेशिक अधिकारी अधिकारी अमित भामरे व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थित होते. बैठकीत बीड शहरातील एमआयडीसीचा विकास याबाबत व्यापक चर्चा करण्यात आली. ही बैठक सकारात्मक ठरली. दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. बीड एमआयडीसीचा विकास व्हावा या ठिकाणी मोठे उद्योग यावेत, यातून रोजगार निर्मिती व्हावी यासंदर्भात चर्चा करण्यात आली होती. एमआयडीसीसाठी जमिनीची पाहणी देखील झाली असून यापुढील काळात बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होईल अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## ई-नामवर १० शेतमालाचा करण्यात आला समावेश; केंद्रीय कृषी मंत्रालयाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्रीय कृषी मंत्रालयाने १० शेतमालाचा ई-नामवर समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ई-नामवर एकूण २३१ शेतमालाची खरेदी विक्री करता येणार आहे. नव्याने समावेश करण्यात आलेल्या १० शेतमालामध्ये तुळशीचे पान, हरभरा पीठ, गव्हाचे पीठ, भाजलेले हरभरा पीठ, ओला तांबूस पिंगट पीठ, हिंग, वाळलेली मेथीची पाने, बेबी कॉर्न, ड्रॅगन फळ आणि ओला तांबूस पिंगट या शेतमालाचा समावेश करण्यात आल्याचं मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात सांगण्यात आलं आहे.**



भागीदारांसह राज्याचे एजन्सी, व्यापारी, तज्ञ आणि छोट्या शेतकऱ्यांशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आल्याचं मंत्रालयाने सांगितलं आहे. यामधील भाजलेले हरभरा पीठ, वाळलेली मेथी पाने, तांबूस पिंगट आणि हिंग या शेतमालाची गणना दुय्यम व्यापार वर्गात केली जाते. त्यामुळे या शेतमालाचे मूल्यवर्धन करून शेतकरी उत्पादक कंपन्या फायदा होऊ शकतो, असा दावा पत्रकात करण्यात आला आहे. देशभरात २०१६ मध्ये ई-नाम या इलेक्ट्रॉनिक व्यापारी पोर्टलची सुरुवात करण्यात आली. यामध्ये देशातील बाजार समितीना जोडण्यात आले. त्यातून राष्ट्रीय पातळीवर शेतमालाचे एक व्यवस्था निर्माण करण्यात आले. ई-नाममध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या या शेतमालाची गुणवत्तेचे निकष पणन आणि तपासणी संचानालयाकडून ठरवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला दर मिळून फायदा होईल, असा दावा मंत्रालयाचा आहे. तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मवर या शेतमालाचा समावेश करण्यामागे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा व्हावा आणि त्यातून व्यवहारात पारदर्शकता यावी हाच आहे, असंही मंत्रालयाने सांगितलं आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना फायदा होईल. या शेतमालासोबतच इतरही शेतमालाचा यामध्ये समावेश करण्यात यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## अनिल चांदणे यांची भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड

### पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले नियुक्तीचे पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**भाजपमध्ये निष्ठेला न्याय मिळतोच, अगदी याचप्रमाणे अनिल चांदणे यांच्याही निष्ठेला न्याय देण्याचे काम भाजपने केले आहे. लोकनेत्या राज्याच्या पर्यावरण व हवामान आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने, जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या नेतृत्वाखाली अनिल चांदणे यांची भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल श्री. चांदणे यांचे बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन केले जात आहे.**



लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी भारतीय जनता पार्टीला तळागाळापर्यंत घेवून जाण्याचे काम केले. याच लोकनेत्यासोबत भाजपचा कार्यकर्ता म्हणून अनिल चांदणे यांनी काम केलेले आहे. मागील २५ वर्षांपासून ते भाजपमध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करत आहेत. जिल्ह्यात पक्षासह संघटनेला मजबूत करण्यामध्ये श्री. चांदणे हे मोठे योगदान देत आहेत. ते भारतीय जनता पार्टीसह मुंडे कुटूंबियांसाठी अत्यंत निष्ठेने काम करणारे पदाधिकारी आहेत. त्याचबरोबर सामाजिक कामातही ते सदैव पुढेच असतात, याचा भारतीय जनता पार्टीला मोठा फायदा होत आहे, पक्ष, संघटनेसाठी देत असलेले योगदान आणि त्यांची निष्ठा पाहूणच त्यांच्या निष्ठेला भारतीय जनता पार्टीने न्याय देण्याचे काम आज केले आहे. लोकनेत्या राज्याच्या पर्यावरण व हवामान आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने, बीड जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या नेतृत्वाखाली अनिल चांदणे यांची भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यांना या निवडीचे पत्र स्वत: लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. भाजपसह ताईसाहेबांनी दिलेली ही नवी जबाबदारी अत्यंत निष्ठेने पार पाडून पक्ष आणि संघटनेला पावलोपावली मजबूत करण्याचा प्रयत्न मी निश्चित करेल, असा विश्वास आपल्या निवडीनंतर अनिल चांदणे यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत केले जात आहे.

## पान १वरून...

### किसान क्रेडिट कार्डची मार्यादा

मध्यवर्ती सहकारी बँकांचे सभासद आहेत तर उर्वरित विविध बँकांचे सभासद आहेत. क्रेडिट कार्डची मर्यादा वाढविण्यात आल्याने या शेतकऱ्यांना अतिरिक्त लाभ घेता येणार आहे.

-------------

### कराडसह गँगची नार्कोटेस्ट

बातम्यांचे व्हीडीओ का पाहतो? या रागातून अशोक मोहिते यांना मारहाण झाल्याची घटना घडली होती. या घटनेत अशोक मोहिते हे गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेण्यात धारूर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील मारहाण करणारे वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांना धारूर पोलिसांनी कर्नाटक येथून अटक केली आहे.

--------------

### १४ साखर कारखाने बंद

सरासरी साखर उतारादेखील कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळेच एकूण साखर उत्पादन पूर्वीच्या अंदाजापेक्षाही कमी होईल, असे मत साखर तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. राज्यात यंदा ९९ सहकारी, तर १०१ खासगी कारखान्यांनी गाळप हंगामाला सुरुवात केली. त्यानुसार आतापर्यंत ६६ लाख ७६ हजार टन उसाचे गाळप केले आहे. त्यातून ६० लाख ९६ हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे, तर सरासरी साखर उतारा ९.१३ टक्के मिळाला आहे. गेल्या वर्षी याच तारखेपर्यंत राज्यात ७४ लाख ९४ हजार टन उसाचे गाळप झाले होते. त्यातून ७२ लाख ६७ हजार टन साखरेचे उत्पादन झाले होते. गेल्या वर्षी सरासरी साखरेचा उतारा ९.७ टक्के मिळाला होता. पावसाचे अतिप्रमाण आणि उसाला आलेल्या तु-यांमुळे सोलापूर विभागातील बारा कारखाने बंद झाले आहेत. नांदेड विभागातील दोन कारखान्यांनीदेखील धुराडी बंद केली असून यंदा गेल्या वर्षाच्या तुलनेत साखर गाळप हंगाम लवकर संपेल, अशी शक्यता साखर तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

**विभागनिहाय उत्पादन व साखर उतारा**

कोल्हापूर १७.६५१०.७९
पुणे १४.३१९.१८
सोलापूर ९.०९७.९२
अहिल्यानगर ७.३३८.५६
संभाजीनगर ४.७३७.६
नांदेड ७.०८९.३५
अमरावती ०.६८.६
नागपूर ०.१०५.२३
एकूण ६०.९६९.१३

------------

### खरेदी केंद्र बंद ; जिल्ह्यात लाखो टन

केंद्र बंद तारखेचा दाखला देत बंद करण्यात आली आहेत. काल पर्यंत रस्त्याच्या रांगेत उभ्या असलेल्या सोयाबीनचा हमीभावानुसार ४,८९२ प्रतिक्विंटल असलेला भाव आत्ता खाजगी व्यापाऱ्याकडे ३,८०० रु सुद्धा मुश्किलीने विकावा लागत आहे. अन्यथा वर्षभर सोयाबीन घरात सांभाळावी लागेल. अशाप्रकारे शेतकऱ्यांना चिमटीत पकडून आत्मनिर्भरतेची दवंडी सरकार वाजवत आहे. भारतामध्ये तेलबियांची गरज खूप मोठी आहे. देशातील वाढती लोकसंख्या आणि लोकांच्या बदलत्या आहारामुळे तेलबियांच्या मागणीत वाढ झाली आहे. देशात दरवर्षी सुमारे ३५० लाख टन तेलबियांची आवश्यकता असते.भारतातील तेलबियांचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असल्याने, मोठ्या प्रमाणात तेलबियांची आयात करावी लागते. आपली आयात गुणवत्ता ६०% ते ६५% इतकी आहे.तेलबियांच्या आयातीमुळे दरवर्षी सुमारे ७० ते ८० हजार कोटी रुपये तेलबियांच्या आयातीवर खर्च होतात.हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आत्मनिर्भरतेचे पोकळ प्लॅन बनवले जातात, पण योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे वेळोवेळी आयात वाढत जात असताना आपल्याच देशातील शेतकऱ्यांचा माल तारखांच्या आकडेवारीवरून खरेदी करण्याचे थांबवणे म्हणजे आरोपीला न्यायालयाने तारखाच्या कचाट्यात अडकाव त्याचप्रमाणे हे सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी वागत आहे.त्यामुळं सोयाबीन पिकवणे गुन्हा आहे कि काय असे भासू लागले आहे. वेळोवेळी, या प्रश्नांची उकल करून निवेदन- चर्चा करून देखील जर सरकार त्याच चालीवर राहणार असेल तर शेतकरी भावा-बहिणींनो कायदे आणि धोरण ठरवणाऱ्या, खुर्च्या आपल्याशी सावत्र वागत असतील तर आत्ता आपल्याला रस्त्यावर यावं लागेल. आणि आपण पिकवलेल्या माल हमीभावानेच खरेदी करण्यासाठी या सरकारला भाग पाडावे लागेल.हा एकच मार्ग सरकारने आपल्यासमोर ठेवला आहे. आज ''सोयाबीन उत्पादक शेतकरी जात्यात आहे परंतू इतर सगळे शेतकरी सुपात आहेत'' हीच वेळ उद्या कापूस हरभरा तूर या सर्वच शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून या सरकारची कोंडी करण्यासाठी सर्व शेतकरी, शेतकरीपुत्रांनो कंबर कसून लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हा कमिटी करत आहे.

-------------

### लातूर कलबर्गी मार्गावर झालेला

ता उमरगा , विठ्ठल निवृत्ती माने (वय ५५ ) रा मदनेवाडी अशी गंभीर जखमींची नावे आहेत. तर बाबा पाटील हे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघात इतका भिषण होता की दोन्ही वाहनांच्या समोरील बाजूचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. अपघाताची माहिती मिळताच यातील सर्व जखमींना सद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रूग्णवाहीकेतून उमरगा शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

------------

### एसीबीचे पथक केजरीवाल

या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. वृत्तानुसार, एसीबीचे पथक केजरीवाल, खासदार संजय सिंह आणि मुकेश अहलावत यांच्या घरी चौकशीसाठी पोहोचले. एसीबीच्या पथकाने केजरीवाल यांच्या घराची सुमारे दीड तास चौकशी केली. चौकशीनंतर, पथकाने केजरीवाल यांना कायदेशीर नोटीस दिली आणि तेथून निघून गेले. ६ फेब्रुवारी रोजी ३ एजन्सींचे एक्झिट पोल प्रसिद्ध झाल्यानंतर केजरीवाल यांनी हे आरोप केले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत ५ फेब्रुवारी रोजी ७० जागांसाठी ६०.५४% मतदान झाले. निकाल ८ फेब्रुवारी रोजी येतील.

------------

### वडवणी ते चिंचोटी रस्त्यावर

असून त्यामुळे मानवी नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्त्यावरून चार ते पाच गावचे लोक दळणवळण करतात. या रस्त्यावरून विद्यार्थी बसेस, विद्यार्थी रिक्षा, खाजगी वाहन वाहतूक करत आहेत. या खड्ड्यामुळे वाहन चालकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच येत्या २० तारखेला राजा हरिश्चंद्र संस्थान पिंपरी येथे महाशिवरात्री महोत्सव सुरू होत आहे. आणि या देवस्थानाला महाशिवरात्री निमित्त जिल्ह्याभरातून हजारो भावीक येतात. या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या २० तारखेच्या अगोदर या रस्त्याचे तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडी कडून महात्मा फुले चौक वडवणी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी दिला आहे या निवेदनाच्या प्रतिलिपी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद बीड, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जिल्हापरिषद बीड यांनाही देण्यात आले आहे.

--------------

### कायदा हातात

कुठल्याही प्रकरणात सोडले जाणार नाही आणि सर्वांवर पोलीस यंत्रणेचे बारकाईने लक्ष असल्याचेही यावेळी सचिन पांडकर यांनी सांगितले.

----------

### नवीन कत्तलखान्याचे

पूज्य गणेशलालजी महाराज यांची ही निर्वाणभूमी आहे तसेच आचार्य श्री विरागसागर महाराजांचे 'श्री विराग अक्षय समाधी तीर्थस्थळ येथे स्थित आहे. दरवर्षी हजारो श्रद्धाळू जालना येथे दर्शनासाठी येतात. अहिंसा आणि जीवदयेच्या प्रचारासाठी या भूमीने अनमोल योगदान दिले आहे. जालन्यात अनेक गोशाळा कार्यरत असून, हजारो गायींचे संगोपन येथे होत आहे. अशा या पवित्र भूमीवर कत्तलखाना उभारला जाणे अत्यंत वेदनादायी असल्याचे जैन समाजाने स्पष्ट केले होते. प्रस्तावित कत्तलखान्याला विरोध करत सकल जैन समाजाने आक्रमक भूमिका घेतली होती. या संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रेवार यांच्यामार्फत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना निवेदन देण्यात आले. मैत्रेवार यांनी हे निवेदन पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचवले आणि समाजाच्या संतप्त भावना त्यांच्यापर्यंत व्यक्त पोहचविल्या व त्यासोबत चर्चा केली यामुळे पालकमंत्र्यांनी त्याची दखल घेत हा निर्णय रद्द करण्याचा आदेश दिला. असे स्वीय सहाय्यक मंदार वैद्य यांनी हा निर्णय कळवला.

----------

## तीन वर्षांपासून कडा,सु.देवळा,खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी मिळेना पुरूष कर्मचारी!

म्हसोबावाडी : आष्टी तालुक्यातील रस्ते अपघात, गळफास, विषारी द्रव्य प्राशन व इतर काही कारणाने मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी सेवानिवृत्त पवळ एस एस हे कर्मचारी येतं होते परंतु ते सद्या आजारी असल्याने कडा, सुलेमान देवळा,खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रात आल्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी पुरूष कर्मचारी नसल्याने मृतदेहांची अहवेलना होत आहे.मागील अनेक महिन्यांपासून पुरूष शिपाई नसल्याने शवविच्छेदनासाठी इतर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपायाची वाट पाहत मृतदेह तासंतास खोलीत ठेवण्याची वेळ येत आहे.त्याच बरोबर दोन महिला कर्मचाऱ्यांना रात्रीअपरात्री जीव मुठीत धरून थांबावे लागते.आष्टी तालुक्यातील कडा ,सु.देवळा,खुंटेफळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या अनेक महिन्यांपासून पुरूष शिपाई नसल्याने शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह आणल्यानंतर इतर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपाई किंवा सेवानिवृत्त शिपाई येऊ पर्यंत प्रेत शवविच्छेदन खोलीत ठेवले जाते.तासंतास नातेवाईकांना वाट पाहत ताटकळत थांबावे लागत आहे.तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन या तीन ही प्राथमिक आरोग्य केंद्रात तात्काळ अनुभवी पुरूष शिपाई द्यावा.अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यानी दिला आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५




# आपली संस्कृती, परंपरा याची जोपासना करून नव्या पिढीसमोर एक आदर्शवाद ठेवला पाहिजे : डॉ.हेमंत वैद्य

आंबेजोगाई । प्रतिनिधी

आज कुटुंब व्यवस्थेत अनेक प्रश्न, समस्या ,अडचणी उपस्थित होत आहेत. यासाठी आपल्या संस्कृतीचे, परंपरेचे जतन करून समाजासमोर ,नव्या पिढीसमोर एक आदर्शवाद निर्माण केला पाहिजे असे मत डॉ. हेमंत वैद्य यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राज्यशास्त्र विषयाच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर या परिषदेचे उद्घाटक म्हणून स्वामी विद्यानंद सरस्वती, स्वामी सोमानंदजी सरस्वती, डॉ. दिनकर करंबे .बीज भाषक डॉ.शहाबुद्दीन शाकीर, डॉ. अजय गव्हाणे ,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.



प्रीती पोहेकर , डॉ. तात्यापुरी आदींची मंचावर उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. हेमंत वैद्य यांनी ही राज्यशास्त्राची राष्ट्रीय परिषद आयोजित केल्याबद्दल कौतुक केले. समाज एकजूट ठेवण्यासाठी तसेच राष्ट्राची प्रगती करण्यासाठी आर्य समाजाने त्या काळात काम केले आहे. आजच्या इंटरनेट युगात आपण कुठे जायचं आहे हे ठरविले पाहिजे.असेही त्यांनी यावेळी विचार मांडले. यावेळी शोध निबंधाचे विमोचनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटक म्हणून आर्य समाज महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष स्वामी विद्यानंद सरस्वती यांनी आपले विचार मांडताना स्वामी दयानंद सरस्वतींनी अलौकिक कार्य केलं असून वेदानुसार वर्तन स्वामी दयानंद यांनी केलेलं आहे. वेद हे महान आहेत म्हणून वेदांकडे चला अशी शिकवण स्वामी दयानंद यांची होती असेही त्यांनी सांगितले.

यावेळी स्वामी सोमनाथ यांनी आपल्या भावना व्यक्त करताना असे सांगितले वेदांचा प्रचार आणि प्रसार करण्याचं कार्य सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामध्ये पाहायला मिळते. स्वामीजींनी या सत्यार्थ प्रकाश ग्रंथात अनेक विचार मांडल्याचे सांगितले. यावेळी बीज भाषक म्हणून संभाजीनगर येथील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शहाबुद्दीन शाकीर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की , धर्म सुधारणा हे स्वामीजींचे प्रमुख कार्य होतं.स्वामीजींचे त्या काळातील कार्य हे महान होते. धर्म ,नीतिमत्ता व राजकारण हे समाजाचे आधारस्तंभ आहेत या तिन्ही शिवाय आपण जगू शकत नाही. आज नैतिकता सोडल्यामुळे आपण धर्मापासून दूर जात आहोत असेही त्यांनी विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.प्रीती पोहेकर यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्या म्हणाल्या की, महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या राज्यशास्त्र विभागाच्या परिषदेचे कौतुक करून स्वामीजींनी पारंपारिक साहित्याचा आढावा आपल्या स्वतःच्या साहित्यातून घेतला. स्वामी दयानंद सरस्वती व भारतीय राष्ट्रवादाची प्रासंगिकता हा विषय चर्चासत्रासाठी छान असल्याचेही त्यांनी सांगितले. या परिषदेला खूप मोठ्या संख्येने राज्यशास्त्राचे अभ्यासक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन केंद्रे यांनी केले तर आभार डॉ. उमाकांत कुलकर्णी यांनी मानले ही राज्यशास्त्राची परिषद दोन दिवस चालणार आहे यामध्ये काही चर्चासत्रात मान्यवरांचे विचार ऐकायला मिळणार आहेत.



## शिवजयंती अध्यक्षपदी बोराडे तर सचिवपदी देशमुख

मंठा । प्रतिनिधी

येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती ची बैठक मंठा शासकीय श्रामगृह येथे झाली . याप्रसंगी सर्वानुमते सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी अमोल बोराडे तर सचिव पदी शामराव देशमुख उपाध्यक्ष निवृत्ती बोराडे अमोल माने, कोषाध्यक्ष विजय बोराडे, सहकोषाध्यक्ष रामेश्वर भोसले, सचिव शामराव देशमुख, सहसचिव सचिन चव्हाण अनिल बोराडे, प्रसिद्धीप्रमुख. आकाश आघाम, करण बोराडे, गोविंद बोराडे, कृष्णा बोराडे, गजानन माळकर, संघटक, गोपाळ गायकवाड, पांडुरंग बोराडे, बाळू खरात, गणेश बोराडे, शिवाजी बोराडे, सुजित बोराडे, विकास बोराडे, भागवत बोराडे, सदस्य, सतिश राठोड, ओमकार बोराडे, आदित्य मोरे, लक्ष्मण बोराडे रामेश्वर बोराडे सतीश कळणे यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार समिती. कैलास बापू बोराडे, शिवाजी जाधव, संजय बोराडे, एकनाथ काकडे, रणजीत बोराडे, विष्णू वायाळ, बाजीराव बोराडे, शामराव काकडे, संतोष बोराडे, दिगंबर बोराडे, सर्जेराव काका बोराडे, सुनील ठोंबरे, चंदू भाऊ बोराडे, गजानन बोराडे, प्राचार्य नेताजी मुळे, शरद पोटे, याप्रसंगी बैठकीला मंठा तालुक्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गजानन विद्यालयात इ.१० वी व १२ वी निरोप समारंभ उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था संचलित गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी (न )ता. जि. बीड येथे इ.१० वी व १२ वी निरोप समारंभ उत्साहात संपन्न प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक (.. ) बंटीवाड साहेब या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब व बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी वृंद याप्रसंगी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस. पर्यवेक्षक दगडे व्ही.एन. क.म.वि. पर्यवेक्षक शेख एस. वाय, भोसले बी. एस. तसेच अनेक १० वी व १२ वी व विद्यार्थ्यांनीनी आपले



मनोगत व्यक्त केले प्रमुख पाहुणे पोलिस निरीक्षक (.. ) बंटीवाड साहेब उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर संयम चिकाटी हे महत्त्वाचे माध्यम आहे असे ते म्हणाले पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या अध्यक्षीय समारोप करताना विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने चांगले विचार आत्मसात करावेत आपले उद्दिष्ट साध्य करावे व सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका शिंदे मॅडम यांनी केली या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले तर आभार प्रदर्शन माणिक अनुसे यांनी केले यावेळी प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षक , शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

### अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करावेत

अंबड । प्रतिनिधी

अंबड एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस ५१ पदे मानधनावर भरण्यात येणार आहेत. अर्जाचा विहीत नमुना ग्राम पंचायत व अंगणवाडी केंद्रात उपलब्ध करुन दिलेला आहे. तरी किमान बारावी उत्तीर्ण वय १८ ते ३५ दरम्यान असलेल्या स्थानिक महिला अर्जदारांनी शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आपले अर्ज अंबड येथील पंचायत समितीच्या परिसरातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पात सादर करावेत, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंबड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खा.कल्याण काळे आक्रमक; केंद्रीयमंत्री गिरीराज सिंह यांना निवेदन



जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांचा कापूस अजूनही घरात पडून आहे, कारण भारतीय कापूस महामंडळ () कडून खरेदी केंद्रे अनियमितरित्या चालवली जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात कापूस विकावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांची भेट घेऊन तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

खासदार काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांकडून अजूनही ५०% पेक्षा अधिक कापूस विकला गेलेला नाही, आणि अशा परिस्थितीत ची खरेदी केंद्रे बंद करणे हे अन्यायकारक आहे. केंद्र सरकारने कापूस खरेदी प्रक्रिया अखेरच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत सुरू ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

सध्या खाजगी व्यापारी पेक्षा कमी दर देऊन शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सरकारी हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

सरकारकडून त्वरित निर्णयाची अपेक्षा

या संदर्भात केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी या मुद्द्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी ची खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचा आणि व्यापाऱ्यांच्या मनमानीला आळा घालण्याचा विचार केंद्र सरकार करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि त्यांच्या कापसाला न्याय मिळावा, यासाठी खासदार काळे यांचे प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## जवाहर महोत्सव २०२५ विविध उपक्रमांनी साजरा

माजलगाव (प्रतिनिधी) : केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी जवाहर महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाचा ''जवाहर महोत्सव'' ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी विविध उपक्रमांनी संपन्न झाला.

प्रकट कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा हे होते तर संस्थेचे कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. अकोल्याचे प्रसिद्ध साहित्यिक



कवी व निवेदक गोपाल मापारी हे यंदाच्या महोत्सवाचे प्रमुख अतिथी होते.संस्थेचे सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक शिरीष देशमुख,डॉ.सचिन देशमुख,मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते,किशोर मोताळे,अंजली शिंदे,पर्यवेक्षक संतोष जोशी,महोत्सव प्रमुख संजीवनी चांदमारे,विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी आदित्य साळवे,राहुल चव्हाण,प्रतिक पवार,राजेश पवार,ऋतुजा निंबाळकर,गुलनाज शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिमापूजनानंतर धनंजय जाडे,सुबोध देशपांडे, योगिता मोडक आणि गीतमंचाने संस्थेची प्रार्थना,महोत्सव गीत सादर केले.मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते यांनी प्रास्ताविक केले. विद्यालयाचा वार्षिक अंक ''ज्ञानांकुर २०२५'' चे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक संस्थेचे कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख यांनी संस्थेची भूमिका मांडली.

विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी दिले जाणारे जवाहररत्न, जवाहर खेलरत्न आणि जवाहर शिक्षणरत्न या पुरस्काराने अनुक्रमे समृध्दी जाधव,संस्कृती चौधरी आणि शाहरूख तांबोळी यांना सन्मानित करण्यात आले.तसेच वर्षभरातील विविध उपक्रम आणि स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात आले. कवी गोपाल मापारी यांनी विद्यालयातील सर्व उपक्रमांचे कौतुक करत काही गझल आणि कवितांचे सादरीकरण केले. पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे संचालक शिरीष देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर होते.यावेळी दोघांनीही विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन बजरंग बनसोडे, सुनिता भालेराव,निर्मला चव्हाण आणि वैष्णवी राठोड यांनी केले तर महोत्सव प्रमुख संजीवनी चांदमारे यांनी आभार मानले. संस्थेचे आजी-माजी मुख्याध्यापक,शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांची लक्षणीय उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### सोयाबीन खरेदीला एक

परिस्थिती बीड जिल्ह्यात सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यासह राज्यात सोयाबीनची खरेदी वेगाने सुरू असून ६ फेब्रुवारी नंतर ही सोयाबीनची खरेदी पुढे एक महिना तरी अशीच सुरू रहावी, खरेदी केंद्रांचा विलंब आणि शासकीय धोरण यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना किरायाने आणलेल्या वाहनाचे भाडे नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावे अशी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची मागणी आहे. त्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीसाठी आणखी पुढील काही दिवस मुदतवाढ मिळावी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची फरपट थांबवा. आणि सोयाबीन खरेदीला एक महिन्यापर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. यासाठी महाराष्ट्र सरकारचे पणन मंत्री ना.जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे नव्याने मुदतवाढीचा प्रस्ताव पाठवावा अशी अपेक्षाही देशमुख यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे.

### लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी

बसला. गंभीररित्या जखमी झाल्याने त्यांना उपचारांसाठी अंबाजोगाईच्या सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. दरम्यान लक्ष्मण डोईफोडे यांचा मृत्यू झाला आहे. तर इतर तिघांवर दवाखान्यामध्ये उपचार सुरु आहेत.नातेवाईकाच्या लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी, लग्नाचे कपडे खरेदी करण्यासाठी हे पाच जण अहिल्यानगरला जात होते. प्रवासादरम्यान त्यांच्या गाडीचा अपघात झाला. अपघात दोघांचा जागीच मृत्यू झाला. दोन्ही मृत व्यक्ती पेशाने शिक्षक असल्याचे म्हटले जात आहे. याशिवाय अपघातात तीन जण जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मृतदेह केजच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.

### अपूर्ण रस्त्याच्या कामामुळे

काम निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचा आरोप येथील नगरसेवकांनी करत असल्याचे बोलल्या जात आहे तसेच सदरील काम बंद पाडले होते या रस्त्याची गुणवत्ता जोपर्यंत सुधारत नाही तोपर्यंत काम बंदच ठेवणार असल्याचे सांगीतले. होते त्यांनतर हे काम सुरूच करण्यात आले नाही.

याबाबत अद्याप पर्यंत पाच महिने उलटूनही सदरील काम पुन्हा सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आली नाही. या अपूर्ण राहिलेल्या रस्त्याच्या कामामुळे भविष्यात असे अपघात होऊ नयेत यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलून अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मागणी देखील ग्रामस्थांकडून होत आहे. आता याप्रकरणी जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता का कारवाई करतात याकडे जनतेचे लक्ष लागला आहे.

### अभ्यासासोबत विविध खेळाचे

व २१००० रु बक्षीस दिले तर सर्व शिक्षक बांधवाना व पालक वर्गाला आपआपल्या विद्यार्थ्यांनाही वेगवेगळ्या खेळाला प्रेरित करुण स्पर्धेचे आयोजन करुण कु. प्रियंका इंगळे सारखे खेळाडु तयार करावेत यावेळी कु . प्रियंका इंगळे यांनीही आपल्या परिसरातील विध्यार्थी आणि विध्यार्थीनी अभ्यासा सोबत खेळाला ही प्राधान्य देणे गरजेचे आहे असे बोलताना सांगितले.

या कार्यक्रमासाठी मा . सभापती तथा जिल्हाअध्यक्ष राष्ट्रवादी पक्ष श्री राजेश्वर अबा चव्हाण . केज प .स चे मा . उपसभापती तथा अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक युवा नेते मा. ऋषीकेशभैय्या आडसकर साहेब . जि .प चे मा.सदस्य श्री भागवतराव नेटके, चेअरमन श्री उद्धवराव इंगोल सह इतर मान्यवर विध्यार्थी व आडस आणि पंच कोषीतील ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आनेगाव येथील जि.प.

सौदागर,पत्रकार सचिन उजगरे,पत्रकार दत्ता मुजमुले, पीएसआय चन्नशेट्टी,योगेश समुद्रे,श्री.सुधाकर मुळे,श्री.धनंजय गुजर हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या माजी विद्यार्थिनी कु.ज्ञानेश्वरी गवळी व कु.श्रद्धा हंडीबाग यांनी केले.कार्यक्रमाच्य यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.रघुनाथ पौळ,श्री.जयराम मांगडे व श्रीमती पुनम हंडीबाग यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार अरविंद ओव्हाळ

धडाडीचे पत्रकार अरविंद ओव्हाळ यांनी पत्रकार म्हणुन काम करत असताना तालुक्यातील विविध सामाजिक व जनहिताचे प्रश्न सोडवण्यासाठी कायम प्रयत्नशील असतात. सडेतोड बातम्यांच्या माध्यमातुन त्यांनी अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत. ते ध्येयनिष्ठ व सडेतोड लिखाण करणारे पत्रकार म्हणुन सर्व परिचित आहेत. ओव्हाळ यांचे कार्य समाजहिताचे असल्याने त्यांच्या कार्याची माजलगाव येथील निर्भिड पत्रकार संघाने दखल घेत संघाच्या वतीने दि ६ फेब्रुवारी २०२५ रोजी येथील वैष्णवी मंगल कार्यालयात अरविंद ओव्हाळ यांचा सपत्नीक निर्भीड पत्रकार संघाचा मानाचा असा मुकनायक पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.

### कॅन्सरचा वाढलेला विळखा

सचिव धनराज सोळंकी,तसेच भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष साहिल मुथा,सचिव आदेश कर्नाटक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.पांढऱ्या रंगाची फीत कापून या कॅन्सर डे जनजागृती रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले कॅन्सर जनजागृतीचे फलक घेतले हाती घेतलेले होते. विविध घोषणा या ठिकाणी दिल्या जात होत्या तर एलईडी व्हन द्वारे चौकाचौकात व अबाजोगाईतील शाळेत जावुन व्हिडिओच्या माध्यमातून जनजागृती केली जात होती. ही रॅली अंबाजोगाई शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सुरू झाली त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, सायगाव नाका, जुना पेट्रोल पंप, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते संत मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी या रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी लातूर येथील कॅन्सर रोग तज्ञ डॉ. प्रियंका राठोड यांनी उपस्थितांना महत्त्वपूर्ण सूचना करून प्रत्येकाने आता कॅन्सरची काळजी घेतली पाहिजे असे सांगितले. कारण आता कॅन्सरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे वेगवेगळ्या माध्यमातून कॅन्सरचा प्रभाव वाढला आहे.महिला पुरुष यांनी याबाबतीत काळजी घेतली पाहिजे सजगता म्हणून प्रत्येकाने त्या ठिकाणी तपासणी करून घेतली पाहिजे. डॉक्टर हे त्याबाबतीत लक्षणे सांगतात आणि त्याची काळजी घेतली पाहिजे. महिलांनी तीसी नंतर व पुरुषांनी ४० नंतर तपासणी करून घ्यावी. पूर्वी धुम्रपान हे एकमेव कारण कॅन्सरचे मानले जायचे पण आता कॅन्सरचा विळखा वाढतो आहे तो वेगवेगळ्या माध्यमातून येऊ लागला आहे. धूम्रपानासोबतच आपली लाइफस्टाईल, बदलते पर्यावरण आणि आहार विहारातून सुद्धा कॅन्सरने आता जागा घेतली आहे. कॅन्सर डे च्या निमित्ताने ही जनजागृती रॅली महत्त्वाची ठरणार असल्याचा आशावाद डॉ. प्रियंका राठोड यांनी व्यक्त केला. तर आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी बोलताना सांगितले की, आपल्या देशात प्रामुख्याने दोन आजारांचे आजारांचा प्रभाव वाढला आहे ज्यामध्ये हृदयरोग आणि कॅन्सर यांचा समावेश आहे ही चिंताजनक बाब आहे आपण ज्ञात असताना सुद्धा रिस्क घेतो आणि जीव गमावून बसतो. याचा मोठा परिणाम कुटुंबाला भोगावा लागतो. जरदा असेल किंवा गुटखा असेल यावर शब्द स्पष्ट शब्दात अधोरेखित केलेले असताना सुद्धा आपण त्याला आपलेसे करतो तसेच डॉक्टर वारंवार कॅन्सर असो की हृदयरोग यासंबंधी काळजी घेण्याचे सांगत असतात त्याकडे साफ साफ दुर्लक्ष केले जाते. व्यायाम करण्याचे तसेच बदलत्या वातावरणाानुसार आहार विहाराचे नियम सांगतात पण काळजी घेतली जात नाही म्हणून प्रत्येकाचा जीव या ठिकाणी जातो. त्या दृष्टीने डॉक्टरांना प्रत्येकाचा जीव महत्त्वाचा आहे म्हणून सर्व समाजसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन ही जनजागृती रॅली काढली असल्याचे सांगितले. या रॅलीत आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, सचिव डॉ. सचिन पोतदार डॉ. सुधीर धर्मपात्रे, रोटरीचे ओमकेश मामा दहिफळे, डॉ. अनिल केंद्रे, स्वप्नील परदेशी, भीमाशंकर शिंदे, अंगदराव कराड,डॉ.निशिकांत पाचेगावकर, राजेंद्र घोडके, जगदीश जाजू, गणेश राऊत,डॉ. सुरेश आरसुडे ,स्वरूपाताई कुलकर्णी, बालाजी घाडगे ,संतोष मोहीते ,अजित देशमुख, तसेच भारतीय जैन संघटनेचे प्रवीण सोळंकी, निलेश मुथा ,संतोष डागा,जवाहर मर्लेचा ,विजय बडेरा, मयूर बडेरा, पियुष मुथा, उदय रूपडा, मीना डागा, सुनीता कात्रेला तसेच शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्र असेल उपकेंद्र असेल व रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स,स्टाफ नर्स, आरोग्य सेविका सेवक शिवाय विविध नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी व त्यांचे प्राचार्य आणि कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होते. या जनजागृती रॅलीचा समारोप संत मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी पार पडला या ठिकाणी सुद्धा आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी मार्गदर्शन केले.रो धनराज सोलंकी यांनी आभार मानले.

# सोयाबीन खरेदीची मुदत संपली, राहिलेल्या सोयाबीनचं करायचं काय?

## शेतकरी चिंतेत, राज्य सरकारचा केंद्राकडे प्रस्ताव

सध्या राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण सरकारी सोयाबीन खरेदीची मुदत संपली आहे. मात्र, सध्या राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी होणं बाकी आहे. मात्र मुदत संपल्यानं राहिलेल्या सोयाबीनचे करायचे काय? असा सवाल शेतकरी करत आहेत. अशातच राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत झालेल्या सोयाबीन खरेदीला जानेवारीपासून आतापर्यंत तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता देखील आपण मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव केंद्राकडडे पाठवला असल्याची माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे.



संपूर्ण राज्यामध्ये सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणावर : संपूर्ण राज्यामध्ये सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणावर होत असताना काल या सोयाबीन खरेदीची मुदत संपली आहे. त्यानंतर राज्यातील बहुतेक जिल्ह्यात सोयाबीन खरेदीला मुदत वाढ मिळण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. भारताच्या इतिहासात महाराष्ट्रात आतापर्यंत जवळपास सव्वा ११ लाख टन इतकी सोयाबीन खरेदी झाल्याची माहिती रावल यांनी दिली आहे. तसेच या सोयाबीनची साडेचार हजार रुपये भावाने सोयाबीनची खरेदी झाल्याची माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे. शेतकऱ्यांची कुठलीही गैरसोय होणार नाही यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याची माहिती देखील यावेळी जयकुमार रावल यांनी दिली आहे. ही योजाना शेतकऱ्यांसाठी आहे की व्यापाऱ्यांसाठी? रविकांत तुपकरांचा हल्लाबोल

अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होणे बाकी आहे. राज्याचे सोयाबीनचे उत्पादन हे ६० ते ६५ लाख मेट्रीक टन आहे. त्यातील सरकार १३ लाख मेट्रीक टन सोयाबीन खरेदी करणार आहे. त्यातील सरकारने फक्त ७ ते ८ लाख मेट्रीक टन सोयाबीन खरेदी केलं आहे. राहिलेलं सोयाबीन आम्ही कुठं फेकायचं? असा सवाल तुपकर यांनी केला आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी आहे की व्यापाऱ्यांसाठी आहे? असा सवालही त्यांनी केला. ज्या संस्थाची अवकात नाही, त्या संस्थाना सोयाबीन खरेदी करण्याचे अधिकार दिले असल्याचे तुपकर म्हणाले. सोयाबीन खरेदी करणाऱ्या संस्थांनी प्रचंड मोठा घोळ घातल्याचा आरोप रविकांत तुपकर यांनी केला आहे. यांनी खाली लोकं नेमले आहेत. आचारसंहितेच्या काळात राज्याचे पणन सचिव आणि पणनचे संचालक यांनी घोळ घातला आहे. ज्या संस्थाची औकात नाही, त्यांना सोयाबीन खरेदीचे टेंडर दिले जात असल्याचे तुपकर म्हणाले.

# पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड करा आणि कमवा जास्तीचे पैसे

जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो.

यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो. ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे. शेतकरी हे फूल पिकवून परदेशात पुरवठा करू शकतात. केवळ एक एकर शेतात दररोज ४५ ते ५० किलो गुलाबाची फुले येतात. जी चांगल्या किमतीत विकली जाते. या फुलाची लागवड करून शेतकरी बांधवांना दररोज १० ते २० हजार रुपयांचा नफा मिळू शकतो. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ देखील फुलांच्या उत्पादनावर उत्कृष्ट अनुदान देते. रशिया आणि युक्रेनच्या युद्धामुळं महागाईचा भडका उडाला. भारतातील भल्याभल्यांचं तर कंबरडं मोडलंच, सोबतच प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजही याची झळ सोसावी लागत आहे. पण रशिया-युक्रेनच्या युध्दामुळं पुण्याच्या मावळमधील मुकुंद ठाकरेंना कमालीचा फायदा झाला आहे. गुलाबातून त्यांनी चांगली कमाई केली आहे.



# शेतकऱ्यांनो फेब्रुवारी महिन्यात करा या ५ भाज्यांची लागवड

## आर्थिक उत्पादनासाठी आहेत फायद्याच्या

देशातील शेतकरी हंगाम आणि महिन्यानुसार त्यांच्या शेतात विविध पिके घेतात. जेणेकरून त्यांना त्यांच्या शेतीतून वेळेत चांगले उत्पन्न मिळू शकेल. याच अनुषंगाने शेतकऱ्यांसाठी फेब्रुवारी महिन्यात कोणत्या टॉप ५ भाज्यांच्या लागवड करावी याची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

तूर, मिरची, भेंडी, कारले आणि भोपळा या प्रमुख पाच भाज्यांना बाजारात मागणी खूप आहे. शेतकऱ्यांना त्याची लागवड करताना फार कष्ट करण्याची गरज नाही.



तूर : तुरीची लागवड जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. याशिवाय जिवाणू असलेल्या नाल्यातही पेरणी करता येते. उष्ण आणि दमट हवामान आवश्यक असते. बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या तुरीची लागवड सुरू करण्यासाठी फेब्रुवारी हा सर्वोत्तम महिना आहे. कोरड्या कडधान्याच्या बियांपासूनही तेल काढता येते. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत.


कारले: शेतकरी जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत कारल्याची लागवड करू शकतात. परंतु कारली पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी चांगला निचरा होणारी चिकणमातीची जमीन आवश्यक आहे.

मिरची : मिरचीची लागवड खरीप आणि रब्बी पीक म्हणून करता येते. शेतकरी कधीही त्यांच्या शेतात मिरचीचे पीक लावू शकतात. खरीप पिकांसाठी पेरणीचे महिने मे ते जून असतात तर रब्बी पिकांसाठी सप्टेंबर ते ऑक्टोबर. परंतु उन्हाळी पीक म्हणून मिरचीची लागवड केल्यास जानेवारी आणि फेब्रुवारी हे महिने उत्तम मानले जातात.भोपळा : देशातील शेतकरी डोंगराळ भागात तसेच सपाट भागात सहजपणे भोपळा लागवड करू शकतात. लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान आवश्यक असते. भोपळा बिया शेतात पेरण्यापूर्वी २४ तास पाण्यात भिजत ठेवा. हे बियाणे उगवण प्रक्रियेला गती देते. या प्रक्रियेनंतर बियाणे शेतात पेरण्यासाठी तयार होते.

भेंडी : भेंडी ही भारतीय बाजारपेठेत सर्वाधिक खरेदी केलेली भाजी आहे. ही एक भाजी आहे जी देशाच्या बहुतेक भागात लागवड केली जाते. भेंडीचे तीन मुख्य लागवड हंगाम फेब्रुवारी-एप्रिल, जून-जुलै आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर आहेत. या काळात शेतकरी भेंडी लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

# तंबाखूच्या शेतीतून शेतकरी लखपती, जाणून घ्या लागवडीची पद्धत

शेतीमध्ये, तंबाखूचा वापर सेंद्रिय कीटकनाशके बनवण्यासाठी केला जातो. शेतात खत म्हणून त्याचा वापर केला जातो. तंबाखूचा वापर अनेक प्रकारची औषधे बनवण्यासाठी केला जातो. त्यात निकोटीन असल्यामुळे त्याचा वापर अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल औषधे बनवण्यासाठी केला जातो. तंबाखूचे तेल वार्निश आणि रंगासाठी उद्योगांमध्ये वापरले जाते. तंबाखूचे तेल काढण्यासाठी कृषी आनंद विद्यापीठाने 'ऑटोमॅटिक ऑइल मिल' हे पहिले भारतीय यंत्र तयार केले आहे.



तंबाखूचा वापर आरोग्यासाठी हानिकारक मानला जातो. तंबाखू वाळवून त्याचा धूर आणि धुराचे पदार्थ बनवण्यासाठी वापर केला जातो. तंबाखूपासून सिगारेट, बिडी, सिगार, पान मसाला, खैनी अशा अनेक गोष्टी बनवल्या जातात. भारतात तंबाखूची लागवड जवळपास सर्वच राज्यांमध्ये केली जाते. परंतु आंध्र प्रदेश, गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, बिहार, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश ही राज्ये त्याच्या लागवडीच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. भारतात अनेक प्रकारच्या व्यावसायिक तंबाखूचे उत्पादन होते. तंबाखू हे कमी कष्टाचे नगदी पीक आहे. ज्यातून चांगला नफा मिळू शकतो. अशा परिस्थितीत तुम्हालाही तंबाखू शेती करायची असेल तर ही बातमी तुमच्यासाठीच महत्त्वाची आहे. आज आम्ही तुम्हाला तंबाखू लागवडीशी संबंधित प्रत्येक माहिती देणार आहोत.

तंबाखूचा वापर कुठे होतो?

शेतीमध्ये, तंबाखूचा वापर सेंद्रिय कीटकनाशके बनवण्यासाठी केला जातो. शेतात खत म्हणून त्याचा वापर केला जातो. तंबाखूचा वापर अनेक प्रकारची औषधे बनवण्यासाठी केला जातो. त्यात निकोटीन असल्यामुळे त्याचा वापर अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल औषधे बनवण्यासाठी केला जातो. तंबाखूचे तेल वार्निश आणि रंगासाठी उद्योगांमध्ये वापरले जाते. तंबाखूचे तेल काढण्यासाठी कृषी आनंद विद्यापीठाने 'ऑटोमॅटिक ऑइल मिल' हे पहिले भारतीय यंत्र तयार केले आहे.

तंबाखूच्या प्रजाती

भारतात तंबाखूच्या दोन प्रजाती पिकवल्या जातात- निकोटियाना टेबेकम निकोटियाना रस्टिका

निकोटियाना टेबेकमची भारतात निकोटियाना रस्टिकापेक्षा जास्त लागवड केली जाते. टेबेकम हे देशाच्या जवळपास सर्वच भागात घेतले जाते. तर रस्टिकाची लागवड ईशान्य भारतात (पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम) येथे केली जाते. निकोटियाना टेबेकमची लागवड सिगारेट, सिगार, सिगार, बिडी, च्यूइंग आणि स्नफ तंबाखूसाठी केली जाते. निकोटियाना रस्टिकाची लागवड हुक्का, चघळणे आणि स्नफसाठी केली जाते. निकोटियाना टेबेकमच्या पानांमध्ये ५ ते ५.२५ टक्के निकोटीन आढळते. तर निकोटियाना रस्टिकाच्या पानांमध्ये ३.८ ते ८ टक्के निकोटीन आढळते.

तंबाखूची लागवड कशी करावी?

२० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर ही तंबाखू लागवडीसाठी योग्य वेळ मानली जाते. नर्सरीमध्ये तंबाखूच्या बिया पेरल्या जातात. रोपवाटिकेत रोपे तयार केल्यानंतर ती शेतात लावली जातात. रोपवाटिका तयार करण्यासाठी १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर हा सर्वोत्तम काळ आहे.

तंबाखूचे बियाणे कोठे खरेदी करावे?

शेतकरी तंबाखूचे बियाणे ऑनलाइन खरेदी करू शकतात. याशिवाय, आपण शासकीय उद्यान विभाग किंवा आपल्या जवळच्या कृषी विज्ञान केंद्र किंवा कृषी महाविद्यालयाशी संपर्क साधून त्याच्या लागवडीची संपूर्ण माहिती मिळवू शकतात.

अनुकूल हवामान

तंबाखूच्या लागवडीसाठी थंड आणि कोरडे हवामान आवश्यक आहे. त्याच्या लागवडीसाठी जास्तीत जास्त १०० सेमी पाऊस पुरेसा आहे. त्याच्या रोपाला उगवणासाठी सुमारे १५ अंश तापमान आणि वाढीसाठी सुमारे २० अंश तापमान आवश्यक आहे. तंबाखूच्या लागवडीसाठी लाल चिकणमाती आणि हलकी भुसभुशीत माती सर्वात योग्य आहे. पेरणीपूर्वी शेताची २ ते ३ वेळा नांगरणी करावी. शेवटच्या नांगरणीच्या वेळी शेताची सपाटीकरण करून गाळणी करावी. आणि शेत तणमुक्त ठेवावे.

सिंचन :

तंबाखूच्या झाडांना पहिले पाणी लागवडीनंतर लगेच द्यावे. पहिल्या सिंचनानंतर, दर १५ दिवसांनी झाडांना हलके पाणी द्या. त्यामुळे जमिनीत ओलावा राहून झाडाची वाढ चांगली होते.

रोपांची छाटणी :

तंबाखूच्या रोपाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात तंबाखू मिळविण्यासाठी झाडांवर तयार झालेल्या कळ्या (फुलांच्या कळ्या) आणि बाजूच्या फांद्या तोडल्या पाहिजेत. पण बियाणे बनवण्यासाठी लागवड केली असेल तर कळ्या तुटू नयेत हे लक्षात ठेवा. तंबाखूचे पीक १२० ते १३० दिवसांत पक्क होते. त्यानंतर त्याची खालील पाने कोरडी होऊन कडक झाल्यावर काढणी करावी. त्याची रोपे मुळांजवळ काढावीत.




### महत्वाच्या घटना

१७१४ : छत्रपती शाहू महाराज (सातारा गादी) आणि सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यात वळवंड (लोणावळा) येथे तह झाला.
१८४९ : रोमन प्रजासत्ताकची रचना करण्यात आली.
१८९९ : रँडचा खून करण्यार्या चाफेकर बंधूंची नावे इंग्रज सरकारला सांगणार्या गणेश शंकर द्रविड व रामचंद्र शंकर द्रविड या बंधूंचा वासुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांनी गोळ्या झाडून वध केला.
१९३१ : महादेव विठ्ठल काळे यांनी 'आत्मोद्धार' नावाचे पाक्षिक सुरू केले.
१९३६ : १६ सप्टेंबर १९३५ रोजी नोंदणी झालेल्या 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे कामकाज सुरू झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानने सिंगापूर ताब्यात घेतले.
१९४३ : आजच्या दिवशी नेताजी सुभाष चंद्र बोस जर्मनी मधून एका नावेच्या माध्यमाने जपान साठी निघाले.
१९६० : पंजाबच्या खडकसिंह या मल्लाविरुद्ध गुणांवर विजय मिळवून गणपत आंदळकर 'हिंदकेसरी' बनले.
१९७१ : हा अमेरिकन शेअर बाजाराचा निर्देशांक सुरू झाला.
१९८६ : आजच्या दिवशी दिल्लीच्या विमानतळावर प्रीपेड टॅक्सी ची सुरुवात.
१९९४ : भारतीय गोलंदाज कपिलदेव निखंज यांनी ४३२ बळींचा जागतिक विक्रम केला.
१९९९ : आजच्या दिवशी अंतराळातून स्टारडस्ट नावाचे अंतरीक्ष यान रवाना झाले.
२००० : छत्रपती शिवाजी महाराज जयंती १९ फेब्रुवारीस करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय.
२००८ : ओडीसा च्या शशुपालगढ येथे २५०० वर्षापूर्वीचे शहर उत्खनन करते वेळी सापडले.
२०१५ : नीती आयोगाची पहिली बैठक.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६७७ : जॅक्स कॅसिनी - फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: १६ एप्रिल १७५६)
१७०० : डॅनियल बर्नोली - डच गणितज्ञ (मृत्यू: १७ मार्च १७८२)
१८२८ : ज्यूल्स वर्न - फ्रेन्च लेखक (मृत्यू: २४ मार्च १९०५)
१८३४ : दिमित्री मेंदेलिएव्ह - रशियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २ फेब्रुवारी १९०७)
१८४४ : गोविंद शंकरशास्त्री बापट - भाषांतरकार
१८८१ : सिविल सर्विसेस मध्ये असलेले वी.टी. कृष्णमाचारी यांचा जन्म.
१८९७ : डॉ. झाकिर हुसेन - भारताचे ३ रे राष्ट्रपती, शिक्षणतज्ञ. पद्मविभूषण व भारतरत्न हे सन्मान त्यांना देण्यात आलो होते. 'जमिया मिलिया इस्लामिया' या शिक्षण संस्थेचे संपादक पुढे ही संस्था विद्यापीठात रुपांतरित झाली. (मृत्यू: ३ मे १९६९)
१९०९ : प्रा. केशव विष्णू तथा 'बाबा' बेलसरे - तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे शिष्य (३ जानेवारी १९९८)
१९२५ : शोभा गुर्टू - शास्त्रीय गायिका (मृत्यू: २७ सप्टेंबर २००४)
१९४१ : जगजीतसिंग - गझलगायक (मृत्यू: १० आक्टोबर २०११)
१९५१ : हिंदी भाषेचे प्रसिद्ध लेखक अशोक चक्रधर यांचा जन्म.
१९६३ : मोहम्मद अजहरुद्दीन - भारतीय क्रिकेटपटू
१९८० : भारतीय चित्रपट अभिनेते जयदीप अहलावत यांचा जन्म.
१९८६ : भारतीय महिला क्रिकेटर एकता बिष्ट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२५ : पीटर द ग्रेट (पहिला) - रशियाचा झार (जन्म: ९ जून १६७२)
१९२७ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर - ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (जन्म: ७ सप्टेंबर १८४९)
१९६५ : च्या भारत - पाक युद्धकाळात ते नौदलप्रमुख होते. (जन्म: मार्च १९१३)
१९७१ : डॉ. कन्हैय्यालाल मुन्शी - मुंबईचे पहिले गृहमंत्री, हैदराबाद संस्थानात भारत सरकारचे एंजट जनरल, नामवंत साहित्यिक आणि 'भारतीय विद्याभवन'चे संस्थापक (जन्म: ३० डिसेंबर १८८७)
१९७५ : रॉबर्ट रॉबिनसन - वनस्पतिज रंग व अल्कलॉईड्सवर संशोधन करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: १३ सप्टेंबर १८८६)
१९९४ : यशवंत नरसिंह केळकर - कवी, कोशकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, शाहिरी वाङ्मयाचे संग्राहक, संपादक व प्रकाशक (जन्म: १९ जुलै १९०२)
१९९४ : गोपाळराव देऊसकर - ख्यातनाम चित्रकार (जन्म: १९११)
१९९५ : भास्करराव सोमण - भारताचे माजी नौदलप्रमुख, व्हाईस अॅडमिरल.
१९९५ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक कल्पना दत्त यांचे निधन.
१९९५ : राजस्थान चे माजी मुख्यमंत्री टीका राम पलीवाल यांचे निधन.
१९९९ : डॉ. इंदुताई पटवर्धन - आनंदग्रामच्या संस्थापिका व थोर समाजसेविका (जन्म: १४ मे १९२६)
२००६ : भारतीय मॉडेल कुलजित रंधवा यांचे निधन.

# रुग्णसेवेत वेगळी ओळख निर्माण करा

## डॉ.अशोक थोरात:माऊली नर्सिंगमध्ये शपथग्रहण सोहळा

बीड। प्रतिनिधी

आज तुम्ही सर्वजण रुग्णसेवेची शपथ ग्रहण करत आहात. पुढे चालून या क्षेत्रातील सेवेतून आपली वेगळी ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी केले. बीड शहरातील धानोरा रोडवरील माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजीत शपथग्रहण सोहळ्यात ते बोलत होते.

माऊली नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या शपथग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, काँग्रेस नेते रविंद्र दळवी, राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे, मेट्रन रमा गिरी, इंजि.रविंद्र तोंडे, पोलिस निरीक्षक खेडकर, डॉ.अनिल सानप, डॉ.सचिन आंधळकर, डॉ.अनंत मुळे, डॉ.चोले, भाजपा नेते अजय सवाई, डॉ.वर्षा तिडके, अनिल चांदणे, भैय्या मोरे, डॉ.लक्ष्मण जाधव, विनोद मुळुक, अनिल राठोड, रणजित बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी



फलोरेन्स नाईटींगेल यांचे प्रतिमापुजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठीच आपण कार्य करत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक थोरात यांनी मी गत पंचवीस वर्षांपासून रुग्णसेवेत आहे. या क्षेत्रात कौशल्यपूर्ण कामाच्या आधारावर एक वेगळी ओळख निर्माण करु शकलो आहे. तुम्ही देखील सेवा क्षेत्रात आहात त्यामुळे एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रामाणिक कार्य करत रहा असे मार्गदर्शन विद्यार्थीनींना केले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे यांनी महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात डॉ.महादेव मुंडे महत्त्वाचे योगदान देत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना विविध अभ्यासक्रम त्यांनी बीडमध्ये उपलब्ध करुन दिले असून यामुळे या विद्यार्थीनी स्वतःच्या पायावर उभा राहू शकणार आहेत. तर काँग्रेसचे नेते रवि दळवी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की सध्याच्या स्पर्धेच्या काळात नर्सिंग क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. अगदी भारतात आणि भारताबाहेर देखील या क्षेत्रात रोजगार मिळू शकतात असे सांगितले. यावेळी सुभाष धस यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.संगीता मुंडे यांनी केले. यावेळी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य वृंदावनी कांबळे, प्राचार्य धनंजय मेडकर, उपप्राचार्य शुभम जोगदंड, यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनीसह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# प्रियंका इंगळेने घेतले जरांगे पाटलांचे आर्शिवाद !



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कळंबअंबा आंतरराष्ट्रीय खो-खो पट्टू, भारताला खो-खो विश्वचषक मिळवून देणारी महाराष्ट्राची कन्या आणि खो-खो संघाची यशस्वी कर्णधार प्रियंका इंगळे यांनी मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली.

यावेळी देदीप्यमान यशाबद्दल मनोज दादा जरांगे पाटील यांनी प्रियंका ताईचा सत्कार करून अभिनंदन केले. प्रियंकाताईच्या घवघवीत यशाचा अभिमान बाळगून दादांनी पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघाने नेपाळचा ७८-४० असा पराभव करून प्रथमच विश्वविजेतेपद पटकावले आहे. सुरुवातीपासूनच भारताच्या लेकींनी दमदार कामगिरी दाखवत कोणत्याही संघाला पुनरागमनाची संधी दिली नाही. अंतिम सामन्यातही नेपाळने भारतासमोर पूर्णपणे गुडघे टेकले आणि भारताने बाजी मारली. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील प्रियांका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या सामन्यात इतिहास रचला आहे.

# मुकनायक पुरस्काराने ज्ञानेश्वर लंगे सन्मानित



वडवणी। प्रतिनिधी

साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मुकुनायक पुरस्कार काल दि. ६ फेब्रुवारी वार गुरूवार रोजी भव्य दिव्य कार्यक्रमात प्रकाशराज आंबेडकर, आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते देऊन माजलगाव येथे त्यांचा गौरव करण्यात आला.

संपादक ज्ञानेश्वर लंगे यांनी अल्पावधीत गदर साप्ताहिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालून आपल्या वर्तमानपत्रात आवाज उठवला. जनतेच्या मनामध्ये गदर साप्ताहिकाने अल्पावधीत नाव कमावल आहे. या साप्ताहिकाच्या कामाची दखल घेऊन माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाने संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकुनायक पुरस्कार जाहीर केला होता. काल दिनांक ६ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या दिमाखात हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये डॉ. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराजजी आंबेडकर माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके दलित पँथरचे दीपक केदार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मूकनायक पुरस्काराणे सन्मानित केले. यावेळी माजलगाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमीद, राजरत्न डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत भिलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुलकर्णी, मार्गदर्शक प्रचंड सोळंके ,मुंजा गाडेकर, बालासाहेब उफाडे रामभाऊ यादव, रंजीत आडागळे, गणेश तौर, तेजस शिंदे, दत्ता जाधव आधी सदस्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# सरस्वती शाळेचे शंभर टक्के यश



बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे घेतल्या गेलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेत शहरातील धानोरा रोड शिवाजीनगर येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेने आपली शंभर टक्के यश देण्याची परंपरा कायम ठेवत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. नुकताच या परीक्षांचा निकाल घोषित झाला आहे . इयत्ता दहावीतील विद्यार्थी क्षितिज उघाडे व श्रेया मस्के या विद्यार्थ्यांनी इंटरमिजिएट परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन यश मिळवले तर इयत्ता नववीतील विद्यार्थिनी स्नेहल डोळसे हिने एलिमेंटरी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला. एलिमेंटरी परीक्षेसाठी शासनाकडून निर्धारित केलेले विषय वस्तू चित्र , स्मरण चित्र , संकल्पचित्र , नक्षीकाम व कर्तव्य भूमिती आणि इंटरमिजिएट परीक्षेसाठी निर्धारित केलेले स्थिर चित्र , स्मरण चित्र , संकल्पचित्र , नक्षीकाम , कर्तव्य भूमिती , घन भूमिती व अक्षरलेखन या सर्वच विषयांची तयारी शाळेतील शिक्षकांनी करून घेतल्यामुळे या सर्वच विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक यास मिळवले आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक होत आहे.

# शिवजन्मोत्सवानिमित्त आजपासून माजलगाव येथे श्रीमद्भागवत कथा

## शोभायात्रेत सहभागी होण्याचे बाळू ताकट यांचे आवाहन

माजलगाव। प्रतिनिधी

शिवजन्मोत्सवा निमित्त आज दि ०८ फेब्रुवारी शनिवार रोजी पासूनश्रीमद्? भागवत कथेची सुश्री राधास्वरुपा अनन्या दीदी शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १०:०० वाजता शहरातील हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदान येथील सभा मंडपापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळू ताकट यांनी केले.

शिवजन्मोत्सवा निमित्त यावेळी सामूहिक विवाह सोहळ्यासह यावेळी



श्रीमद्? भागवत कथा, तिरुपती बालाजी महोत्सव आदी कार्यक्रम पार पडणार असून सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती पार पडणार आहे.त्याच अनुषंगाने आज दि.८ फेब्रुवारी शनिवार पासून श्रीमद्? भागवत कथेची सुरुवात होणार आहे. कथावाचक सुश्री राधास्वरुपा अनन्यादीदी शर्मा यांच्या मधुर वाणीतून दि.८ ते दि.१२ फेब्रुवारी दरम्यान श्रीमद्? भागवत कथा पार पडणार आहे.तत्पूर्वी आज सकाळी १०:०० वाजता हनुमान मंदिर,हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदानावरील कथा स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.या शोभायात्रेत नागरिकांनी सहभागी होऊन श्रीमद्? भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव विवाह सोहळ्याचे आयोजक बाळू ताकट यांनी केले आहे.

# जेष्ठ नागरिकांना सन्मानाने जगता यावे-न्या.सोनी

बीड। प्रतिनिधी

जेष्ठ नागरिकांचे आयुष्य सुखकर व्हावे म्हणून शासनाने जेष्ठ नागरिकांसाठी कायदा निर्माण केला आहे. सोबतच काही विशेष सेवा सुविधा निर्माण केल्या आहेत. ते कायदे व सेवा सुविधांची माहिती वृद्धांना देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण प्रयत्न करत आहे. कुणालाही या सेवा सुविधा व कायदेशीर मदतीची गरज असल्यास १५१०० या नंबरवर माहीती द्यावी असे आवाहन विधी सेवा प्राधिकरण बीड चे सदस्य सचिव मा. जि जि सोनी यांनी केली. १५१०० असे विचार विधीसेवा प्राधिकरण चे सदस्य सचिव मा. जि. जि सोनी यांनी व्यक्त केले. आपले घर वृध्दाश्रम कळसंबर येथे आयोजित कायदेविषयक शिबीराचे ते बोलत होते. दींनाक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

आपला परिवार कळसंबर येथील वृध्दाश्रमात वृध्दांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनीही वृध्दांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, शासनाच्या योजन व कायदे लोकांपर्यंत पोहोचवून



लोकांना कायद्यासंबंधी साक्षर बनवण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण अग्रेसर आहे. त्याचाच भाग म्हणून आज आम्ही आपले घर या वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या साठी असणाऱ्या योजनांची माहिती देत आहोत. जेष्ठ नागरिकांना सन्मानाने जगता यावे. त्यांनी समाजासाठी देशासाठी दीलेल्या योगदानाबद्दल सर्वांचे धन्यवाद व्यक्त करुन कायद्याची माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेच्या सचिव मनिषा पवार यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुनील पवार यांनी मानले. विधी सेवा प्राधिकरणाच्या या कार्यक्रमात वृद्धाश्रमातील सर्व जेष्ठ नागरिक हजर होते. त्यांनी आपल्या समस्या व प्रश्न या कार्यक्रमात विचारले. व कायद्याची सखोल माहिती घेतली.

# सत्कारामुळे प्रेरणा मिळते राहते-बोकरे

परळी। प्रतिनिधी

गुणवंतांच्या सत्कारामुळे इतरांना प्रेरणा मिळते तसेच परळी शहरातील अशा कार्यक्रमामुळे शहराचे राज्यात नावलौकिक होण्यास मदत होते असे प्रतिपादन नुकतेच अन्न प्रशासन अधिकारी पदी निवड झालेल्या आरती बोकरे यांनी केले. दै. मराठवाडा साथीच्या कार्यालयात एमपीएससी च्या वतीने अन्न व औषध प्रशासन अधिकारी पदी निवड झालेल्या आरती बोकरे हिचा डॉ. सौ. ज्योती दौंड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

एमपीएससी च्या वतीने अन्न व औषध प्रशासन अधिकारी पदी निवड झालेल्या आरती बोकरे हिचा दै.मराठवाडा साथीच्या वतीने डॉ. ज्योती दौंड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आरती बोकरे यांनी सत्काराला उत्तर देताना आपण कशा परिस्थितीत शिक्षण घेतले हे सांगितले. तसेच सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते असेही त्या



म्हणाल्या.यावेळी ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, दै.मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक ओमप्रकाश बुरांडे, पुण्यनगरीचे परळी शहर प्रतिनिधी धनंजय आरबुने, दै.संघर्षनेताचे संपादक मोहन व्हावळे, फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे, संपादक नितीन ढाकणे, पत्रकार गणेश आदोडे, पत्रकार संदीप मस्के, संतोष जुजगर, नरसिंग अन्नलदास, सुमित गिरी, लक्ष्मण वैराळ सर, संदीप समुद्रे, अनिल गायकवाड, रवि पतंगे, श्रीधर जोशी आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

## जाहीरनामा

**मा.श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७९/२०२५**

**विधीज्ञ ॲड. अनुराग ठोसर**

**विजयमाला वि. कोणीही नाही**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारः १) विजयमाला भ्र.अशोकराव शिंदे, वय-६४वर्षे, धंदा-घरकाम, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड ,२) अतुल पि. अशोकराव शिंदे, वय-४४वर्षे, धंदा-शेती, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड,३) अमोल पि. अशोकराव शिंदे, वय-६४वर्षे, धंदा-घरकाम, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड ,४) कोमल भ्र.किरण पाटील, वय-३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे अशोकराव पि.विठ्ठलराव शिंदे हे राहणार मौजे ढेकणमोहा ता. जि. बीड हे दिनांक २०/१०/२०२४ रोजी मौजे ढेकणमोहा ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयत नामे अशोकराव पि.विठ्ठलराव शिंदे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत अशोकराव पि.विठ्ठलराव शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०३/२०२५ आहे. आज दिनांक ०३/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# जवाहर महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा




माजलगाव। प्रतिनिधी

केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी जवाहर महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाचा ''जवाहर महोत्सव'' ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी विविध उपक्रमांनी संपन्न झाला.

प्रकट कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा हे होते तर संस्थेचे कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. अकोल्याचे प्रसिद्ध साहित्यिक कवी व निवेदक गोपाल मापारी हे यंदाच्या महोत्सवाचे प्रमुख अतिथी होते.संस्थेचे सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक शिरीष देशमुख,डॉ.सचिन देशमुख,मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते,किशोर मोताळे,अंजली शिंदे,पर्यवेक्षक संतोष जोशी,महोत्सव प्रमुख संजीवनी चांदमारे,विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी आदित्य साळवे,राहुल चव्हाण,प्रतिक पवार,राजेश पवार,ऋतुजा निंबाळकर,गुलनाज शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रतिमापूजनानंतर धनंजय जाडे,सुबोध देशपांडे, योगिता मोडक आणि गीतमंचाने संस्थेची प्रार्थना,महोत्सव गीत सादर केले. मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते यांनी प्रास्ताविक केले. विद्यालयाचा वार्षिक अंक ''ज्ञानाकुंर २०२५'' चे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक संस्थेचे कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख यांनी संस्थेची भूमिका मांडली. विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी दिले जाणारे जवाहररत्न, जवाहर खेलरत्न आणि जवाहर शिक्षणरत्न या पुरस्काराने अनुक्रमे समृध्दी जाधव,संस्कृती चौधरी आणि शाहरूख तांबोळी यांना सन्मानित करण्यात आले.तसेच वर्षभरातील विविध उपक्रम आणि स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात आले.कवी गोपाल मापारी यांनी विद्यालयातील सर्व उपक्रमांचे कौतुक करत काही गझल आणि कवितांचे सादरीकरण केले. पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे संचालक शिरीष देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर होते.यावेळी दोघांनीही विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन बजरंग बनसोडे, सुनिता भालेराव,निर्मला चव्हाण आणि वैष्णवी राठोड यांनी केले तर महोत्सव प्रमुख संजीवनी चांदमारे यांनी आभार मानले. संस्थेचे आजी-माजी मुख्याध्यापक,शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# शालेय साहित्य वाटप करून माता रमाई आंबेडकर जयंती

युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे यांनी त्यागमुर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माळेगाव हायस्कुल मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून माता रमाईंना अभिवादन केले.

गेल्या काही वर्षापासुन सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे हे महापुरुषांच्या विचारांना अनुसरून अशी प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करतात यावेळी सुद्धा त्यांनी तीच सामाजिक बांधिलकी जोपासत विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विद्वतेच्या शिखरावर घेऊन जाणारी त्याची सावली अर्थात त्यागमुर्ती माता रमाई बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांनी सुकळी येथील शिवारात असणाऱ्या माळेगाव हायस्कुल माळेगाव मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत महापुरूषांच्या विचारांना अभिप्रेत अशी माता रमाई आंबेडकर जयंती साजरी करत त्यांना अभिवादन केले.यावेळी मुख्यध्यापक एस.एम लोकरे,शिक्षक कर्मचारी ए.एस जाधव,एस.आर सारूक,एस.बी गुजर,एम.एम लामतुरे,एम.एस फुंदे,जी.जे कदम,डि.वाय नागरगोजे,बी.बी भोसले,ए.डी इतापे व विद्यार्थी उपस्थित होते.



# अवैध गौणखनिज उपशावर कठोर कारवाई करा-संपर्कमंत्री पंकजाताई मुंडे यांचा इशारा

## अति उत्साही कार्यकर्त्यांना आता तरी सुद्धा असा दिला सल्ला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अवैध वाळूउपसा अवैध गौणखनिज उपसा तसेच मोकळ्या हायवातून होणारी थर्मलमधील राखेची वाहातूक या सर्व बाबीकडे लक्ष देवून कठोर कारवाई करण्याचा इशारा बीड जिल्ह्याच्या संपर्कमंत्री पंकजा मुंडे यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत दिला. बीड दौऱ्यावर आलेल्या राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारात आपल्या उत्साही कार्यकर्त्यांना सुधरा या शब्दात संयमाचा सल्ला दिला.



### अवैध वाळू उपशावर कठोर कारवाई करा

बीड जिल्ह्यामध्ये जो अवैध वाळू उपसा होतो. गौण खनिज अवैधरित्या उत्खलन केले जाते. याशिवाय दगडी कोळशाची राख ही बंद कंटेनर मध्येच वाहतुक केली पाहिजे. ज्यामुळे प्रदूषण होणार नाही .कारण प्रदूषण हा आपला विषय आहे. म्हणून या सर्व गोष्टी पाळल्या पाहिजेत आणि यासाठी महसूल प्रशासनाने अवैध उपसा करणाऱ्या वाळू,गौण खनिज माफियावर कठोर कारवाई केली पाहिजे. जर कारवाई केली नाही तर अधिकाऱ्यावर कारवाई होईल. असा सज्जड दम पर्यावरण मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या संपर्क मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांना दिला. याच वेळी महसूल अधिकाऱ्यांना पोलीस प्रशासनाने सहकार्य करावे अशा सूचनाही केल्या.

मंत्री पंकजा मुंडे यांनी बिड्सच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. बैठक संपवून त्या निघत असताना कार्यालयाच्या परिसरात भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या सत्काराची तयारी केली होती. मुंडे यांनी अगोदर तर सत्कार घ्यायला नका दिला. तुम्ही माझे किती वेळा सत्कार करणार ? असा सवाल पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांना केला. त्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर पंकजा मुंडेंनी सत्कार स्वीकारला, त्यावेळी काही कार्यकर्त्यांनी ताई तुम्हीच आमच्या पालकमंत्री असे म्हणायला सुरुवात केली. यावेळी पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांना करड्या आवाजात सुनावले. आपले पालकमंत्री अजितदादा आहेत. हे लिहून ठेवा आणि लक्षात ठेवा . मी संपर्क मंत्री आहे असे सांगितले. यावरही काहींनी आमच्यासाठी पालकमंत्री तुम्हीच असे म्हटल्यानंतर मंत्री पकंजा मुंडेंनी या उत्साही कार्यकर्त्यांना अरे सुधरा रे असे सांगत संयमाचा सल्ला दिला.

### या व्यतिरिक्त कुठलाही प्रश्न नको

माझ्या खात्याशी संबंधित आणि माझ्याशी संबंधित जे काही प्रश्न असतील तेवढेच विचारा या व्यतिरिक्त कुठलाही प्रश्न मला विचारू नका. असे प्रश्न विचारून तुम्ही जिल्ह्याला खड्ड्यात घालत आहेत. असा सज्जड दम इलेक्ट्रॉनिक मीडिया वाल्यांना पंकजाताई यांनी यावेळी दिला. याबरोबरच अती उत्साही कार्यकर्त्यांनाही आता तरी सुधरा असा दमही यावेळी त्यांनी बाहेर आल्यानंतर दिला.



# लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी जाताना जीपचा भीषण अपघात

## दोघांचा जागीच मृत्यू, तीन जण गंभीर जखमी

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये आज सकाळी केज-बीड रोडवर एक भीषण अपघात झाला. कॅन्टर टेम्पो आणि जीपमध्ये अपघातामध्ये दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघातामध्ये तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात बीड रोडवरच्या सांगवी पुलाजवळ झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जीपमधून नातेवाईकांच्या लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी पाच जण बीडहून आहिल्यानगरला चालले होते. दरम्यान केज-बीड रोडवर सांगवी (सारणी) पुलाजवळ टेम्पो आणि जीपची धडक झाली. यात उर्मिला उर्फ उमा श्रीराम घुले या महिलेचा जागीच मृत्यू झाला. त्या केज तालुक्यातील कोरेगावच्या रहिवासी होत्या.

बीड रोडवरील या भीषण अपघातामध्ये लक्ष्मण डोईफोडे, राम डोईफोडे आणि अन्य दोघांना जबर मार पान ३ वर

# आनेगाव येथील जि.प.शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील आनेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांचे वैविध्यपूर्ण प्रदर्शन करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यासोबतच यावेळी पालकांनीही विविध नाटके सादर केली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पुजन करून करण्यात आली यावेळी



विद्यार्थ्यांनी विविध हिंदी-मराठी गाण्यांवर अतिशय सुंदर असे नृत्य सादर केले तसेच यावेळी पालकांसाठी समाजप्रबोधन पर नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये पालकांनी सादर केलेल्या नाटकातून प्रथम क्रमांक-जैसी करनी वैसी भरणी,द्वितीय क्रमांक-अकरा रुपये ठेवा अंगात आला देवा,तृतीय क्रमांक-काळ्या आईची व्यथा या नाटकांना मिळाले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.लक्ष्मण लाखे तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.सुनील केंद्रे,केंद्रप्रमुख श्री.संजय चौरे,केंद्रप्रमुख श्री.अर्जुन बोराडे,पत्रकार श्री.हनुमंत पान ३ वर

# सोयाबीन खरेदीला एक महिन्यापर्यंत मुदतवाढ द्यावी - राजेसाहेब देशमुख

## दर घसरल्याने शेतकऱ्यांत नाराजी; सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची फरपट थांबवा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सोयाबीन खरेदीसाठी आणखी काही दिवस मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. कारण, अद्याप ही ५० टक्क्यांहून अधिक सोयाबीन शेतकऱ्यांकडे शिल्लक आहे. खाजगी व्यापाऱ्यांकडे भाव नाही व शासकीय खरेदी केंद्राकडे अनेक ठिकाणी बारदाना नाही. यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदी केंद्रांवर आणले नव्हते. तशातच मुदतवाढ संपणार असल्याने मागील दहा ते पंधरा दिवसांपासून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन किरायांच्या वाहनातून खरेदी केंद्रांवर आणले आहे. सोयाबीनने भरलेल्या वाहनांच्या रांगा खरेदी केंद्रांसमोर दिसून येत आहेत. सोयाबीनचे दर घसरल्याने शेतकरी वर्गात नाराजी आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची फरपट थांबवा. आणि सोयाबीन खरेदीला एक महिन्यापर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे.



गुरूवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती. त्याची मुदत आज संपली. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. सोयाबीन खरेदीची मुदत गुरूवारी संपणार असल्याने खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची एकच गर्दी उसळली आहे व खरेदी केंद्राबाहेर मागील दहा ते पंधरा दिवसांपासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे आता केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीची मुदत वाढवावी. अन्यथा खाजगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावाने आपले सोयाबीन विकावे लागेल. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन किरायांच्या वाहनातून खरेदी केंद्रांवर आणले आहे. सोयाबीनने भरलेल्या वाहनांच्या रांगा खरेदी केंद्रांसमोर दिसून येत आहेत. एका दिवसाचे भाडे अंदाजे एक हजार रूपये आहे. खाजगी व शासकीय खरेदीच्या भावात एक हजार रूपयांहून अधिकची तफावत आहे. मागील ३ वर्षांचा विचार करता, सोयाबीनच्या दरात ३१ टक्क्यांनी घसरण झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत आहे. तशातच एका शेतकऱ्याच्या नांवावर फक्त २५ क्विंटल एवढेच सोयाबीन खरेदी केले जात आहे. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीनचे अधिक उत्पादन घेतले. त्या शेतकऱ्यांना या जाचक नियमामुळे सोयाबीन विक्री करताना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही पान ३ वर

# पोलिस उपनिरीक्षकाची लोणावळ्यात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील खडकी येथे कार्यरत असलेल्या उपनिरीक्षकाने लोणावळ्यात जाऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. अण्णा गुंजाळ असे आत्महत्या केलेल्या पोलीस उप निरीक्षकाचे नाव आहे. मागील ३ दिवसांपासून गुंजाळ हे ड्युटीवर नव्हते. लोणावळ्यातील टायगर पॉईंट लगत त्यांनी झाडाला गळफास घेतल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.



या घटनेच्या ठिकाणी गुंजाळ यांची गाडीही आढळून आली आहे. या गाडीत एक डायरी आहे. कदाचित या डायरीमध्ये त्यांच्या आत्महत्येमागचे कारण दडलेले असू शकते. लोणावळा ग्रामीण पोलीस घटनास्थळी पोहचलेले असून खडकी पोलीस ही घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत. पोलिसांकडून त्यांचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून याठिकाणी गुंजाळ यांची असलेली गाडीही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. आता या कारमधील डायरीत त्यांनी मृत्यूपूर्वी काही लिहून ठेवले आहे का? याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

अण्णा गुंजाळ हे गेले दोन वर्षांपासून खडकी पोलीस ठाण्यातील तपास पथकात कार्यरत होते. ते मुळचे अहिल्यानगर मधील संगमनेर येथील आहेत. ते ३ फेब्रुवारीपासून रजेवर होते. त्याबाबत त्यांनी काही कळविले नसल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप फुलपगारे यांनी सांगितले.

# अपूर्ण रस्त्याच्या कामामुळे १४ वर्षाचा मुलगा जखमी; १७ टाके पडले, उपअभियंता जबाबदार

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत तीर्थपुरी-अंबड रस्त्यावरील अपूर्ण काममुळे अपघाताला कारणीभूत ठरले. या अपघातात १४ वर्षीय धीरज रामदास नाईकवाडे हा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याला १७ टाके पडले आहेत.



धीरज हा दहीगव्हाण गावातील रहिवासी असून, सायकल दुरुस्तीच्या कामासाठी तीर्थपुरीला जात असताना हा अपघात घडला. याला जबाबदार घनसावंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपा अभियंता खोसे जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे तसेच सदरील अधिकारी छत्रपती संभाजी नगर इथून अपडाऊन करीत असल्यामुळे त्यांचे कामाकडे लक्ष नसल्यामुळे ही दुर्घटना घडली असल्याचे बोलल्या जात आहे. तसेच बऱ्याच वर्षापासून सदरील शाखा अभियंता नंतर उपअभियंता बऱ्याच वर्षापासून एका जिल्ह्यामध्ये कामाचा कारभार बघत आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंता छत्रपती संभाजी नगर यांनी अशा अधिकाऱ्याविरुद्ध तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होत आहे. यामुळे सदरील अपूर्ण रस्त्यामुळे तो सायकलसह रस्त्याच्या बाजूला पडला आणि त्याच्या शरीरात सळई गज घुसले.

धीरजच्या डोक्याला ९, कानाला ४, आणि मानेला ४ असे एकूण १७ टाके पडले आहेत. त्याला तीर्थपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, मात्र त्याची गंभीर स्थिती पाहता पुढील उपचारांसाठी जालना येथे हलविण्यात आले. तीर्थपुरीतील रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे भीषण अपघात घडला. या अपघातात धीरज रामदास नाईकवाडे (वय १४) या मुलाचा गंभीर जखमी होऊन १७ टाके पडले आहेत. अपघाताच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

त्याला पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आले

धीरज सुट्टीच्या निमित्ताने दहीगव्हाण येथे आला होता आणि सायकल दुरुस्ती करण्यासाठी तीर्थपुरीला जात असताना हा अपघात झाला. दरम्यान तीर्थपुरी येथील सुरु असलेल्या घनसावंगी फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत दोपदरी सिमेंट रस्त्याचे पान ३ वर

# पत्रकार अरविंद ओव्हाळ मुकनायक पुरस्काराने सन्मानित



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील धडाडीचे पत्रकार अरविंद ओव्हाळ यांना माजलगाव येथील निर्भिड पत्रकार संघाचा यंदाचा मानाचा व प्रतिष्ठेचा मुकनायक पुरस्कार सर सेनानी रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर ,ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपक केदार यांच्या हस्ते आणि आ प्रकाश सोळंके ,देवेंद्र ढाका ,दयानंद स्वामी ,रवींद्र कानडे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

गेल्या दोन अडीच दशकांपासुन माजलगाव तालुक्यातील पत्रकारितेत सक्रिय असलेले व सध्या उपसंपादक म्हणून काम करत असलेले पान ३ वर

# अभ्यासासोबत विविध खेळाचे आयोजन करून असे गुणी खेळाडू घडवावे -रमेशराव आडसकर



**छत्रपती शिवाजी विद्यालय, आडस शाळेच्या वतीने खो-खो विश्वचषक विजेता संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिचा सत्कार**

**आडस । प्रतिनिधी**

खो खो विश्वकप विजेत्या भारतीय संघाच्या कर्णधार कळबंअंबा गावची कन्या कु. प्रियंका इंगळे यांचा श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आडस च्या वतीने मोठ्या उत्साहाने स्वागत सत्कार करण्यात आला.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, टिपरी नृत्य व औक्षण करत प्रियंकाचे कार्यक्रम स्थळी स्वागत केले.

या समई संस्थेचे सचिव तथा अंबेजोगाई साखर कारखान्याचे चेअरमन मा. रमेशराव आडसकर साहेब यांनी कु . प्रियंका इंगळे यांचे व वडील,आई, आजोबा,आज्जी यांचे कौतुक करत कु . प्रियंका यांना सत्कार करुण ट्रॉफी पान ३ वर

# कॅन्सरचा वाढलेला विळखा चिंताजनक - डॉ.प्रियंका राठोड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात जागतिक कॅन्सर डे च्या निमित्ताने आयएमए अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व भारतीय जैन संघटना,अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अशी जनजागृती रॅली ४ फेब्रुवारी या दिवशी काढण्यात आली. या रॅलीद्वारे सामाजिक संदेश देण्यात आला व विविध घोषणांनी अंबाजोगाई शहर दणाणून गेले या रॅलीत विविध सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था व विविध नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



अंबाजोगाई जागतिक कॅन्सर डे च्या निमित्ताने आयएमए अंबाजोगाई,भारतीय जैन संघटना व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने काढण्यात आली जनजागृती रॅली

राष्ट्रीय कॅन्सर डे च्या निमित्ताने सामाजिक संवेदना जिवंत ठेवत आणि भारतात वाढत असलेले कॅन्सरचे प्रस्थ हे चिंताजनक असून याला प्रतिबंध घालता यावा यासाठी शहरातील आयएमए संघटना, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि भारतीय जैन संघटना, कै बाबुराव घुले नर्सिंग कॉलेज, कै प्रमोद जी महाजन नर्सिंग कॉलेज, शासकीय नर्सिंग कॉलेज, लोखंडी, वेंकटेश नर्सिंग कॉलेज, आशा वर्कर्स, अस्तित्व महिला संघटन, अंबाजोगाई इ च्या पुढाकाराने जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा व लातूर येथील प्रसिद्ध कॅन्सररोग तज्ञ डॉ. प्रियंका राठोड मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी आयएमएचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमएचे सचिव डॉ.सचिन पोतदार ,रोटरीचे जिल्हा सचिव सतीश लोणीकर, रोटरी अंबाजोगाई चे अध्यक्ष रो कल्याण काळे, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# उद्योजकांना त्रास देणाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा इशारा, पोलिसांनाही दिले आदेश

पिंपरी : देशाच्या, राज्याच्या विकासाला पुणे आणि परिसरातील उद्योगधंद्याचा मोठा वाटा आहे. मात्र या उद्योजकांना त्रास दिल्याचे माझ्या कानावर येत आहे. त्यामुळे यापुढे उद्योजकांना त्रास देणार्यांना मोक्का लावा असा आदेश मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांना दिले. तर पुणे शहरात सुरु असणारी वाहनांची तोडफोड, कोयता गँग याचा दाखला देत गुन्हेगारांची धिंड काढा आणि कायदा सुव्यवस्था व्यवस्थित ठेवायचे आदेश उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.



पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तांलयाच्या इमारतीचे भूमिपूजन, महापालिकेच्या विविध कार्यक्रमांचे भूमिपूजन, उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होत आहे. चिखली, जाधववाडी येथे होत असलेल्या कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमपीएमएलच्या व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ व इतर मान्यवर, पदाधिकारी यावेळी उपस्थित आहेत.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, उद्योगांना नाहक त्रास झाला तर मी खपवून घेणार नाही. उद्योजकांना त्रास देणारा कोणत्याही पक्षाचा पदाधिकारी असो किंवा महायुतीच्या घटक पक्षाचा असो त्याच्यावर कडक कारवाई करा, असं अजित पवार म्हणाले. पुणे शहरात दररोज वाहनांची काचा फोडल्याच्या, रिक्षा फोडण्याचा तसेच कोयता गँग अश्या बातम्या वाचायला मिळतात. शहरात गुन्हेगारी वाढली असून, नागरिक भयभीत होत आहेत. त्यामुळे पोलिसांनी अश्या गुन्हेगारांची धिंड काढून त्याची दहशत मोडीत काढली पाहिजे. पोलिसांना गुन्हेगारी रोखता येत नसेल तर एवढ्या १००, २०० कोटींच्या सुविधा काय कामाच्या आहेत. पोलिसांनी गुन्हेगारीवर अंकुश नाही ठेवला तर सगळ्या सुविधा काढून घेऊ, असा सज्जड दम दिला.

## महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम राज्य

पुणे, महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम राज्य असून, देशातील सर्वात जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तळेगाव येथील हॅवमोर लोट्टे आईस्क्रीम उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार सुनील शेळके, लोट्टे समूहाचे अध्यक्ष डोंग बीन शीन, रिपब्लिक ऑफ कोरियाचे भारतातील राजदूत शेंग हो ली, उद्योग विभागाचे सचिव पी अनबलगम, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासू, माजी आमदार बाळा भेगडे, हॅवमोर आईस्क्रीम इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कोमल आनंद आदी मान्यवर उपस्थित होते.

### आईस्क्रीमच्या आठवणीत रमले मुख्यमंत्री

आपल्याला लहानपणी आईस्क्रीम खूप आवडायचे. एक महिना आईस्क्रीम फॅक्टरीमध्ये राहायला जावे असे वाटायचे, असे सांगत आज या प्रकल्पाचे उद्घाटन करताना ते बालपणीच्या आठवणीत काही क्षण रमले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोट्टे आईस्क्रीम उत्पादन सुविधांचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या सुरवातीला मुख्यमंत्री फडणवीस यांनी आईस्क्रीम प्रकल्पाची पाहणी केली.

# मेघवाडी पोलिसांची मोठी कारवाई; दोन पिस्तुलासह सराईत आरोपीला ठोकल्या बेड्या

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. दररोज राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून खून, हाणामारी, गाड्यांची तोडफोड तसेचं चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. यामुळे नागरिकांसोबतचं पोलीसही हैराण झाले आहेत. अशातचं आता एक मोठी बातमी समोर आली आहे. मेघवाडी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दोन पिस्तुल, जिवत काडतुसे आणि दहा लाख रुपये रोख रकमेसह सराईत आरोपीला मेघवाडी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी शस्त्राची विक्री करण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गौस मोहिद्दीन शहाबुद्दीन सय्यद असे आरोपीचे नाव आहे.




सहाय्यक पोलीस निरीक्षक सम्राट वाघ व पोलीस शिपाई दत्तात्रेय बागुल यांना सराईत आरोपी जोगेश्वरी पूर्व येथे शस्त्रांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे जोगेश्वरी पूर्व येथील पश्चिम द्रुतगती मार्गाजवळील रामगड परिसरात पोलिसांना सापळा रचला होता होता. आरोपी गौस मोहिद्दीन शहाबुद्दीन सय्यद येथील पाण्याच्या टाकीजवळ येऊन उभा राहिला होता. त्याची ओळख पटल्यानंतर पोलिसांनी त्याला घेराव घातला. आरोपी पळण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावेळी त्याला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीची झडती घेतली असता त्याच्या जवळ १० लाख रुपये रोख रक्कम, देशी बनावटीच्या दोन पिस्तुल, सहा जिवंत काडतुसे असा एकूण ११ लाख रुपयांचा मुद्देमाल सापडला. आरोपीविरोधात भारतीय शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. आरोपी सराईत गुन्हेगार असून, यापूर्वीही मेघवाडी पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीकडून देशी बनावटीच्या दोन पिस्तुल हस्तगत करण्यात आल्या असून, त्याची विक्री करण्यासाठी आरोपी जोगेश्वरी येथे आला होता. यापूर्वीही आरोपीने अशाच प्रकारे शस्त्रांची विक्री केल्याचा संशय आहे. त्या शस्त्रांच्या विक्रीचे १० लाख रुपये आरोपीकडे मिळाल्याचा संशय आहे. त्यामुळे आरोपीने यापूर्वी कोणाला शस्त्रांची विक्री केली, याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पुणे- मुंबई महामार्गावर भीषण अपघात, भरधाव कारची टेम्पोला धडक; दोघांचा जागीच मृत्यू

वडगाव मावळ । प्रतिनिधी

राज्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने उभ्या असलेल्या टेम्पोवर जाऊन कार धडकली आहे. या भीषण अपघातामध्ये कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी (दि.५) रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे महामार्गावर ब्राम्हणवाडी, साते येथे घडली.



ताविश जावेद अहमद (वय २४), राशीद सोहराब खान (वय २४ आदर्शनगर मोशी ता. हवेली) यांचा जागीच मृत्यू झाला आहे तर दिलशाद नियाज खान (वय २५ रा. आदर्शनगर, मोशी), महम्मद शाहीद रिझवी (वय २४), झिशान कलाम शाहीद (वय २४), फैझान मुस्ताक खान(वय २४ रा. आदर्शनगर, मोशी) हे जखमी झाले आहेत. याबाबत खंडाप्पा बसराज हारकुडे (वय ३५ रा. ब्राम्हणवाडी, साते) यांनी वडगाव मावळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री फैझान मुस्ताक खान हा चार चाकी (कार नं. एम एच १२/एक्सइ ५०८३) चालवत होता. परंतु भरधाव वेगात त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला उभा असणारे आयशर टेम्पोच्या (एमएच ०४/ एचवाय ३१७९) पाठीमागील बाजुस कार आदळली. या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस. ए. जावळे करीत आहेत.

# पत्ता विचारण्याच्या बहाणा करून पुण्यात चोरी; तब्बल २० लाखांचे दागिने लंपास

पुणे : राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक चोरीची घटना उघडकीस आली आहे. मध्यभागात चोरट्यांनी एका सराफ बाजारातील कारागिराला पत्ता विचारण्याच्या बहाणा करून त्याच्या हातातील २० लाखांचे दागिने असलेली पिशवी जबरदस्तीने हिसकावून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. रविवार पेठेतील मोती चौक परिसरात ही घटना घडली आहे.



याप्रकरणी दोन अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चिरनजीत अंबिका बाग (वय २३, सध्या रा. दगडी नागोबा मंदिराजवळ, रविवार पेठ, मूळ रा. पश्चिम बंगाल) याने फरासखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, दोन चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडे आलेल्या तक्रारीनुसार, चिरनजीत हा एका दागिने घडविणाऱ्या कारागिराकडे कामाला आहे. सराफ बाजारातील सराफांनी सोने दिल्यानंतर त्यांना दागिने घडवून दिले जातात. गुरुवारी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास तो रविवार पेठेतून निघाला होता. त्याच्याकडे १९ लाख ९४ हजारांचे सोन्याचे दागिने होते. दागिने त्याने पिशवीत ठेवले होते. मोती चौकातील पदपथावरुन तो निघाला होता. पुष्पम ज्वेलर्ससमोर दोघांनी त्याला अडवून पत्ता विचारण्याचा बहाणा केला. चोरट्यांनी त्याला बोलण्यात गुंतविले. त्याचे लक्ष नसल्याची संधी साधून दागिने असलेली पिशवी हिसकावून चोरटे पसार झाले.

चरणजितने आरडाओरडा केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त अनुजा देशमाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी सोन्या मारुती चौक, मोती चौक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक प्रतिक्षा शेंडगे अधिक तपास करत आहेत.

# मावळ हादरलं! लाथाबुक्क्यांनी अन् काठीने मारहाण करुन एकाचा खून

वडगाव मावळ : राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता मावळमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. मावळ तालुक्यातील पारवडी गावात दोघांनी मिळून एका व्यक्तीला लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करत त्याचा खून केला आहे. ही घटना बुधवारी (दि. ५) रात्री उघडकीस आली आहे.

सागर बाबू रोकडे (वय ५२, रा. पारवडी, ता. मावळ) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोन्या उर्फ सुनील ऋषिनाथ काटकर व संकेत ऋषिनाथ काटकर (दोघे रा. पारवडी, ता. मावळ) अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी कामशेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुधवारी पहाटे आरोपी आणि सागर रोकडे यांचे किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. त्या कारणावरून आरोपींनी सागर यांना हाताने, लाथाबुक्क्यांनी व काठ्यांनी मारहाण करत ठार मारले. त्यानंतर सागर रोकडे यांचा मृतदेह त्यांच्या घरात आणून ठेवला. बुधवारी रात्री ही घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी सोन्या काटकर याला अटक केली आहे. कामशेत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पैशांबरोबरच चोरट्यांचा आता शेतमालावर डल्ला; द्राक्ष चोरून बंधाऱ्यात फेकली

नारायणगाव : आजपर्यंत आपण अनेकदा सोने चांदीचे दागिने व पैशांची चोरी, दरोडे किंवा मंदिरातील दानपेट्या फोडून त्यातील पैसे व इतर ऐवज चोरल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात ऐकल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांच्या शेतमालावर डल्ला मारून त्याचे नुकसान करण्याचा प्रकारही आता घडू लागला आहे. नारायणगाव येथील शशिकांत वसंत कोल्हे यांच्या तोडणीस आलेल्या जम्बो वाणाच्या द्राक्षांची चोरी करून ती द्राक्ष खाऊन झाल्यानंतर ग्रामपंचायत नारायणगाव यांनी केलेल्या बंधार्यात फेकून देण्याचा प्रकार उघडकीस आला आहे .



याबाबत ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे यांनी सांगितले की, नारायणगाव ग्रामपंचायतच्या वतीने नुकतेच कोल्हेमाळा येथे छोटे छोटे बंधारे करण्यात आले आहेत. या बंधाऱ्याच्या जवळच असलेल्या शशिकांत कोल्हे यांच्या द्राक्ष बागेतून अज्ञात चोरट्यांनी गुरुवारी दिनांक ६ रोजी मध्य रात्री द्राक्षांची चोरी करून काही द्राक्षे बंधाऱ्यात फेकून दिली. येथील शेतकरी सुनील कोल्हे सकाळी शेतावर काम करण्यासाठी गेले असता त्यांच्या ही बाब निदर्शनास आली. अशा प्रकारे मागील वर्षी व त्याआधी शेतकऱ्यांची तोडणीस आलेली द्राक्षे तसेच डाळिंब, पपई व इतर फळझाडे अज्ञात चोरट्यांनी व माथेफीरूंनी चोरी केली होती.

तसेच द्राक्ष बागेतील वेली जमिनीलगत खोडापासून कटर, कुऱ्हाड किंवा कोयत्याच्या साह्याने तोडून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान यापूर्वीही केले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आपल्या शेतावर शेतमालाची राखण करण्याची गरज भासू लागली आहे. दरम्यान या भागात मोठ्या प्रमाणावर बिबट्याचे अस्तित्व असताना आपल्या शेतमालाला पहारा कसा द्यावा असाही प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.

# राज्यातील सर्व ऊसतोड कामगारांना आता मिळणार ओळखपत्र; सर्वेक्षणानंतर घेतला जाणार निर्णय

पुणे : राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. त्यातच आता लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळातर्फे राज्यातील सर्व ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्व्हेक्षणानंतर त्यांना ओळखपत्र दिले जाणार असल्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने घेतला आहे.



२४ फेब्रुवारी २०२० रोजी शासनाच्या निर्णयानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने हे महामंडळ सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडे हस्तांतरित केले आहे. राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून कामगारांना ओळखपत्रांचे वाटप करण्यासाठी २० कोटी रुपये खर्चाला राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. कामगारांना विविध कल्याणकारी आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभदेण्यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या १३ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ स्थापन केले आहे.

२० जिल्ह्यांमध्ये जास्त कामगारांची संख्या

संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या महामंडळाचे कार्यक्षेत्र असून, राज्यातील ऊसतोड कामगारांची एकूण अंदाजित संख्या ही १० लाखांपेक्षा जास्त आहे. प्रामुख्याने राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये ऊसतोड कामगारांचे प्रमाण जास्त असून, ऊसतोड कामगार हे प्रामुख्याने ग्रामीण भागात राहतात. सहा महिने आपल्या मूळगावी तर सहा महिने ते स्थलांतर करून ऊसतोडणीच्या ठिकाणी वास्तव्यास असतात.

काम देण्यात येणार एजन्सीला

सर्वच ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता यावा, यासाठी ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करुन त्यांची अधिकृत नोंदणी करुन त्यांना ओळखपत्र वितरित करणे अत्यावश्यक आहे. हे शासनाच्या विचाराधीन होते. या कामासाठी शासनाने ई-निविदा प्रक्रिया राबविली असून हे काम एजन्सीला देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करुन त्यांची नोंदणी करणे आणि त्यांना ओळखपत्र वितरित करणे या दोन वेगवेगळ्या कामांसाठी अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

# लग्नाच्या आमिषाने तरुणीवर लैंगिक अत्याचार करुन ४५ लाख रुपये उकळले; काश्मिरी तरूणाला अटक

पुणे – लग्नाच्या आमिषाने तरुणीवर लैंगिक अत्याचार करुन ४५ लाख रुपये उकळणाऱ्या काश्मिरी तरुणाला मध्य प्रदेशात अटक करण्यात आली. त्याने दिल्ली, फरिदाबाद, भोपाळ, इंदूरमधील तरुणींची विवाहाच्या आमिषाने फसवणूक केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. ही कामगिरी काळेपडळ पोलीस ठाण्याने केली.




अमन प्रेमलाल वर्मा ( ३८, रा. बिश्ना, जम्मू काश्मिर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी एका तरुणीने फिर्याद दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वर्मा मूळचा जम्मू काश्मिरमधील आहे. त्याने एका विवाह विषयक संकेतस्थळावर नोंदणी केली होती. संकेतस्थळाच्या माध्यमातून तो तरुणींशी संपर्क साधायचा. त्यांना विवाहाचे आमिष दाखवून जाळ्यात ओढायचा. हडपसर परिसरातील पिडीत तरुणीला त्याने जाळ्यात ओढले होते. त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला, तसेच तिच्याकडून वेळोवेळी बतावणी करुन ४५ लाख रुपये घेतले.

तरुणीची फसवणूक करुन तो पुण्यातून पसार झाला होता. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने वर्माला मध्य प्रदेशातील इंदूर परिसरातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने विवाहाच्या आमिषाने दिल्ली, फरिदाबाद, इंदूर, भोपाळमधील तरुणींची फसवणूक केल्याचे सांगितले. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक निरीक्षक विलास सुतार, हवालदार युवराज दुधाळ, श्रीकृष्ण खोकले यांनी ही कामगिरी केली.

पिडीत तरुणी संगणक कंपनीत कामाला आहे. तीची २०२० मध्ये अमनबरोबर विवाहविषयक संकेतस्थळावर ओळख झाली होती. त्यांनतर तीने मागील तीन-चार वर्षे एकूण ४५ लाख रुपये दिले आहेत. त्याचा २०२१ मध्ये विवाह झाला असून एक मुलगाही आहे. तो जम्मूमध्ये एका खासगी कंपनीत काम करतो. त्याच्यावर इतर राज्यात दोन खटले सुरु आहेत तर एका गुन्हयात त्याने तडफोड केली आहे. त्याचे व्यक्तीमत्व रुबाबदार असल्याने अनेक मुली त्याच्यावर विश्वास ठेऊन फसल्या गेल्या आहेत.

# हिंदू गर्जना प्रतिष्ठान, पुनित बालन ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेस शानदार प्रारंभ

पुणे : हिंदू गर्जना प्रतिष्ठान आणि पुनीत बालन ग्रुप यांच्या संयुकक्त विद्यमाने आयोजित 'हिंदू गर्जना चषक' महिला व पुरूष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेस आज शानदार प्रारंभ झाला. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा भव्यदिव्य कुस्ती स्पर्धांचे आयोजन झाल्यास आपल्याला निश्चितच उत्तम कुस्तीपटू निर्माण करता येतील, अशी विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.



राजस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. उद्घाटन समारंभप्रसंगी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्ता भरणे, स्पर्धेचे आयोजक पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन आणि हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष एस.के. जैन, सप महाविद्यालय अध्यक्ष केशव वझे, हिंदकेसरी अमोल बुचडे आदि मान्यवर उपस्थित होते.

कामामध्ये व्यग्र असल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार उद्घाटन समारंभास उपस्थित राहू शकले नसल्याचे सांगून मा. चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, धीरज घाटे गेले चार वर्ष कुस्तीच्या स्पर्धा आयोजित करत असून आपल्या कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानासुद्धा राज्याच्या कुस्तीपटूंचे नुकसान नको व्हायला, म्हणून सुमारे ९०० पेक्षा जास्त सहभागी असलेल्या या कुस्ती स्पर्धेचे त्यांनी आयोजन केले आहे.

त्यांना पुनीत बालन यांची योग्य साथ मिळाली असल्याने ही स्पर्धा भव्यदिव्य स्वरूपाची झाली आहे. पुनीत बालन यांनी आपल्या लौकिकाला साजेशी अशी ही स्पर्धा आयोजित केली असून स्पर्धेत अनेक बक्षीसे-पारितोषिके देण्यात येणार आहे. मी सुध्दा कोल्हापुरचा पैलवान असून स्पर्धेत मिळणारी पारितोषिके पाहून मलासुद्धा या कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्याचा मोह पडला आहे, असे ते मिश्कीलपणे म्हणाले.